# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०२२

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२२ / पौष २, १९४४ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री** | |
| **(३)** | **रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री** | |
| **(४)** | **कृषी मंत्री** | |
| **(५)** | **सहकार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** | |
| **(६)** | **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४२**

---

### रोहा (जि.रायगड) येथील कुंडलिका नदीपात्रात भूमाफियांनी अतिक्रमण केल्याबाबत

**(१) * ४९९३६ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहा (जि.रायगड) येथील कुंडलिका नदीपात्रात भूमाफियांनी मोठया प्रमाणात बेकायदा अतिक्रमण केल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुंडलिका नदीपात्रात कायमस्वरुपी गाळे उभारुन प्रत्येकी ८५ हजार रुपयांना गाळा विकल्याबाबत रोहा सिटीझन फोरमने मुख्याधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त नदीतील अतिक्रमण हटवून संबंधित दोषींवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नगरपरिषद हद्दीतील कुंडलिका नदी पात्राशेजारी असलेल्या खाजगी मिळकतीत तात्पुरत्या स्वरुपातील लोखंडी तयार गाळे उभारल्याचे दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी निदर्शनास आल्याची वस्तूस्थिती नगरपरिषदेने कळविली आहे.

(२) रोहा सिटीझन फोरम यांच्यामार्फत नदीपात्रातील अतिक्रमण हटविण्याबाबतची तक्रार प्राप्त झाली हे खरे आहे. तथापि ८५ हजार रुपयांना गाळे विकल्याबाबतचा मुद्दा सदर तक्रारीमध्ये नमूद नसल्याची वस्तुस्थिती नगरपरिषदेने कळविली आहे.

(३) कुंडलिका नदीपात्राशेजारील बायपास रोड येथील खाजगी मिळकतीवर तात्पुरत्या स्वरुपातील लोखंडी तयार गाळे उभारल्याची बाब निदर्शनास येताच सदर अतिक्रमण काढून टाकण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही सुरु केली असता संबंधित खाजगी मिळकतधारकांनी सदरचे तात्पुरत्या स्वरुपातील तयार लोखंडी गाळे स्वत:हून काढून टाकल्याची वस्तूस्थिती नगरपरिषदेने कळविली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात स्वर्गीय गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान योजना राबविण्याबाबत**

**(२) * ५१००६ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.अशोक पवार(शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांचा अपघाती मृत्यू झाल्यास स्वर्गीय गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत दोन लाख रुपयापर्यंतची मदत देय ठरत असून विमा कंपनीसोबतचा करार संपुष्टात आल्यामुळे ही योजना दिनांक ७ एप्रिल, २०२२ पासून खंडित झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने नव्याने विमा कंपनीची निवड करुनही अद्यापपर्यंत करार न झाल्यामुळे या योजनेंतर्गत अनेक प्रकरणे प्रलंबित राहिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेत कुटुंब म्हणून पती-पत्नी, मुलगा, आई-वडील व अविवाहित मुलगी यांचा समावेश असून त्यात सूनेचा समावेश नसल्यामुळे कुटुंबातील व्यक्ती मदतीपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी नवीन कंपनीची तातडीने नियुक्ती करुन सर्व प्रलंबित प्रस्ताव निकाली काढण्याबाबत तसेच विम्याऐवजी अपघात सानुग्रह अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेतंर्गत योजनेचा लाभ देण्यासाठी राज्यातील वहितीधारक खातेदार शेतकरी व शेतकऱ्यांच्या कुटुंबातील १ सदस्य जसे की, आई-वडील,शेतक-यांची पती / पत्नी, मुलगा व अविवाहित मुलगी यापैकी कोणताही सदस्य यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

(४) शासन निर्णय दिनांक २८.११.२०२२ अन्वये दिनांक ७.०४.२०२२ ते २२.०८.२०२२ या कालावधीस खंडीत कालावधी म्हणून घोषित करुन सदर कालावधीतील प्रलंबित विमा प्रस्ताव निकाली काढण्यास विशेष बाब म्हणून शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे. यानुसार पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

तसेच प्रचलित योजनेत सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**परतवाडा (जि.अमरावती) येथील अवैधरित्या होणारी सागवान चोरी रोखण्याबाबत**

**(३) * ५१२७५ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परतवाडा (जि.अमरावती) येथे लाखो रुपयांचे अवैध सागवान वाहून नेणारे चार चाकी वाहन बहिरम नाक्यावरील वन कर्मचाऱ्याला आढळून आल्याचे दिनांक ७ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच वनपरिक्षेत्रांतर्गत प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अवैध जंगलतोड करुन सागवान लाकडाची तस्करी मागील काही महिन्यांपासून मोठ्या प्रमाणात सुरु असल्याचेही माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) त्याचप्रमाणे मेळघाट वनविभागासह अमरावती प्रादेशिक वन विभागांतर्गत येणाऱ्या जंगलातूनही लाकडाची तस्करी होत असल्याचे देखील आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सागवान लाकडाची तस्करी करणाऱ्यांवर कारवाई करुन तस्करी रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे,

अमरावती (प्रादेशिक) वनविभागातील परतवाडा वनपरिक्षेत्रातील बहिरम नाक्यावर दिनांक ०६.०९.२०२२ रोजी अवैध सागवान वाहून नेणारे चार चाकी वाहन महिंद्रा बोलेरो व सागवान २३ चरपट नग (चिराण वनोपज), जप्त करण्यात आले असून सदर प्रकरणी वनगुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(२) व (३) अमरावती (प्रादेशिक) वनविभागातील उपरोक्त नमूद परतवाडासह उर्वरीत सर्व परिक्षेत्रामध्ये माहे जुलै, २०२२ ते माहे सप्टेंबर, २०२२ पर्यंत अवैध वृक्ष तोडीच्या एकुण १७ वनगुन्ह्यांची नोंद झालेली असून, अवैध वृक्षतोडीतील एकूण साग वृक्षांची संख्या ३४ असल्याचे निदर्शनास आले आहे.

मेळघाट (प्रा.),परतवाडा वन विभागा अंतर्गत येणाऱ्या वनक्षेत्रात माहे जुलै २०२२ ते माहे सप्टेंबर २०२२ पर्यंत अवैध वृक्षतोडी बाबत एकूण ४९८ वृक्षांची तोड झाल्याचे निदर्शनास आले असून त्या अनुषंगाने १३६ वनगुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

(४) सागवान लाकडाची तस्करी निदर्शनास आलेली नाही. नोंद करण्यात आलेल्या वनगुन्ह्याची चौकशी वेळोवेळी करण्यात येते, तसेच अवैध वृक्षतोडीवर आळा घालण्याकरीता खालील उपाययोजना राबविण्यात येतात:-

१) अचानकपणे दिवसा व रात्री नाके बंदी करुन अवैध वृक्षतोडीवर नियंत्रण ठेवण्यात येते.
२) वनसंरक्षण कामात पोलीस विभागाची वेळोवेळी मदत घेण्यात येते.
३) गोपनिय माहिती मिळविणे करीता खबऱ्यांची मदत घेण्यात येते.
४) वनक्षेत्रात नियमित जंगल गस्त करुन वनांचे संरक्षण केले जाते.
५) अवैध वनउपजाची वाहतूक होवू नये याकरीता अमरावती वनविभागातील ०४ ठिकाणी वनउपज तपासणी नाके उभारले असून त्या ठिकाणी वनरक्षकाची नेमणूक केली आहे. त्यांचेकडून तपासणी नाक्यावर वाहनांची तपासणी केली जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विदर्भातील ६६ सहकारी उपसा जलसिंचन संस्थेच्या सभासदांच्या कर्ज माफीबाबत**

**(४) * ५२३९१ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील ६६ सहकारी उपसा जलसिंचन संस्थामधील सभासदांच्या कर्ज माफीबाबत उपसा जलसिंचन सहकारी संस्था महासंघ, नागपूर यांच्यासोबत दिनांक २ एप्रिल, २०१३ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुमारे ५६७३ सभासद शेतकऱ्यांकडील रुपये ४८.०४ कोटी मुद्दलाची रक्कम शासनाकडून कर्ज पुरवठा करणाऱ्या बॅंकांना वितरीत करण्यात यावी, अशी मागणी उपसा जलसिंचन सहकारी संस्था महासंघ, नागपूर यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच राज्यातील सहकारी उपसा सिंचन संस्थांच्या कर्जफेडी संदर्भात सन २००९ या कालावधीतील नाशिक विभागातील उपसा सिंचन योजनेच्या धर्तीवर उर्वरित महाराष्ट्रातील संस्थेचे कर्ज माफ केले जाईल, असे आश्वासन तत्कालीन मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व तत्कालीन सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी सभागृहात दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार विदर्भातील सहकारी उपसा जलसिंचन संस्थांच्या सभासदांची कर्जमाफी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) व (२) अमरावती जिल्ह्यातील सहकारी उपसा जलसिंचन योजनांना कर्जमाफी देणे व अमरावती जिल्ह्यातून प्राप्त झालेल्या सहकारी उपसा जलसिंचन योजनांना २५% अनुदान मंजुर करणे याबाबत मा.मंत्री (सहकार) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०२.०४.२०१३ रोजी विधानभवन, मुंबई येथे बैठक आयोजीत करण्यात आली होती.

सदर बैठकीमध्ये विदर्भातील ज्या सहकारी उपसा जलसिंचन संस्थेच्या सभासदांनी जि.म.स. बँका व भुविकास बँकांकडून कर्ज घेतले आहे. त्या बँकांनी व्याज माफी करण्याची तयारी दाखविल्यास मुद्दलाची रक्कम माफ करण्याचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मा. मंत्री (सहकार) यांनी दिले होते.

(३) व (४) राज्यातील सहकारी उपसा सिंचन संस्थांच्या कर्जफेडी संदर्भात सन २००९ मधील हिवाळी अधिवेशनात मा.मंत्री (सहकार) यांनी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने मा.मंत्री (सहकार) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११.०३.२०१३ रोजी बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये संपुर्ण महाराष्ट्रातील उपसा जलसिंचन योजनांच्या थकबाकीबाबत माहिती संकलीत करुन मा. मुख्यमंत्री महोदयांना प्रस्ताव विचारार्थ सादर करण्याचा प्रस्ताव विभागाने सादर करणेबाबत निर्देश देण्यात आले होते.

सदर निर्देशाच्या अनुषंगाने प्रस्ताव सहकार विभागाने नियोजन व वित्त विभागास सादर केला असता, विदर्भातील ६६ सहकारी उपसा जलसिंचन संस्थांना कर्जमाफीचा लाभ दिल्यास राज्यातील इतर उपसा जलसिंचन संस्था या प्रकारची मागणी करु शकतात. त्यामुळे सदर प्रस्ताव मुळ योजनेच्या विहीत तत्वाशी विसंगत असल्याचे अभिप्राय नमुद करुन सदर प्रस्तावास मान्यता दिली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(५) * ५०७८७ श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०१७ पासून नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना (पोकरा) राबविण्यात येत असून या योजनेंतर्गत शेडमध्ये ग्रीन हाऊससारख्या हायटेक शेतीसाठी अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे दळवेल (ता.पारोळा, जि.जळगांव) येथील शेतकऱ्यांनी सदर योजनेमध्ये गैरव्यवहार झाल्याची तक्रार माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान विभागाकडे व बँकेकडे केली असून ओम ॲग्रो सर्व्हिसेस, संबंधित क्षेत्रीय अधिकारी व बँकेचे कर्मचारी हे संगनमताने लाभार्थ्यांचे अनुदान बेकायदेशीररित्या घेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त ठिकाणी अनेक लाभार्थ्यांचे अनुदान खात्यावर न देता बँकेतून परस्पर रक्कम काढल्याच्या घटनाही घडल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) होय, खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही. तक्रारदार शेतकरी श्री.हिरे यांनी दिनांक २१ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये शेडनेट हाऊस मधील साहित्याबाबतच्या तक्रारीचे निराकरण झाल्याने तक्रार मागे घेत असल्याबाबतचे पत्र व खुलासा दिलेला आहे.

प्रकल्पाच्या डिबीटी पोर्टलवरुन संबंधित लाभार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यावर अर्थसहाय्याची रक्कम वितरीत करण्यात येते. त्यामुळे लाभार्थ्यांचे अनुदान बँकेतून परस्पर रक्कम काढणे शक्य नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शेतकऱ्यांना कमाल किरकोळ किंमतीप्रमाणे थकबाकी तसेच सर्व ऊसाचे गाळप करण्याच्या दृष्टीने कार्यवाही होण्याबाबत**

**(६) * ५०३४७ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०२२-२३ या कालावधीत गळीत हंगामात विक्रमी ऊसाचे उत्पादन झाले असुन या हंगामात १३८ साखर कारखान्यांचे ऊसाचे गाळप होणे अपेक्षित असून सन २०२१-२२ या कालावधीत गळीत हंगामात कमाल किरकोळ किंमती एफआरपीप्रमाणे ८१ कारखांन्यांनी शेतकऱ्यांचे ६३९ कोटी रुपये थकविले असल्याचे दिनांक १९ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पनगेश्वर शुगर मिल प्रा.लि. पानगांव (ता.रेणापूर, जि.लातूर) या कारखान्याने सन २०२१-२२ या कालावधीत गळीत हंगामातील गाळप झालेल्या शेतक-यांच्या ऊसाला कमाल किरकोळ किंमत एफआरपीप्रमाणे भाव देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मराठवाड्यातील नांदेड, परभणी, हिंगोली जिल्ह्यातील २७ पैकी १४ साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांची १४० कोटी ५८ लाख रुपयांची एफआरपी रक्कम म्हणजेच रास्त व किफायतशीर दर थकविला असल्याचे दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारस निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ज्या साखर कारखान्यांकडे कमाल किरकोळ किंमत एफआरपी थकीत असते अशा साखर कारखान्यांना पुन्हा गाळप हंगामाची परवानगी दिली जात नाही असे आयुक्तांचे आदेश असतानाही बऱ्याच साखर कारखान्यांनी कमाल किरकोळ किंमत एफआरपी थकविली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, व त्यानुसार राज्यातील शेतकऱ्यांना कमाल किरकोळ किंमती एफआरपी प्रमाणे थकबाकी देण्याच्या दृष्टीने तसेच सर्व ऊसाचे गाळप करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) राज्यात गाळप हंगाम २०२१-२२ मध्ये एकुण २०० साखर कारखान्यानी १३२२.३२ लाख मे.टन गाळप केले असुन दिनांक १५.९.२०२२ अखेर देय FRP रु.४३३१०/- कोटी पैकी रु.४२६७१/- कोटी म्हणजेच ९८.०८% FRP अदा करण्यात आली आहे.
एकुण ११९ साखर कारखान्यांनी १००% FRP ची रक्कम अदा केली आहे. तथापी ८१ साखर कारखान्यांकडे रु.६३९ कोटी थकीत होते.
(२) नाही.
(३) दिनांक ३१.१०.२०२२ अखेर नांदेड विभागातील २७ साखर कारखान्याकडे एकुण ४७०१.६३ कोटी FRP देय होती त्यापैकी ४६८७.४७ कोटी FRP अदा केली आहे. अदा केलेल्या रक्कमेची टक्केवारी ९९.५०% आहे.
(४) हंगाम २०२१-२२ मध्ये FRP अदा न केलेल्या एकुण १८ कारखान्याविरुध्द साखर आयुक्तालयाकडून महसुली वसुली प्रमाणपत्र (RRC) निर्गमित करण्यात आलेले आहेत.
(५) साखर आयुक्तालयाने FRP अदा न केलेल्या कारखान्यांविरुध्द महसुली वसुली प्रमाणपत्र (RRC) निर्गमित करण्यात आले असुन संबंधित जिल्हाधिकारी यांना पुढील कार्यवाहीसाठी कळविण्यात आले आहे. हंगाम २०२२-२३ मध्ये राज्यात एकुण १७८ साखर कारखाने सुरु असून दिनांक १.१२.२०२२ अखेर २३९.९२ लाख मे.टन गाळप

करण्यात आले आहे. राज्यातील संपुर्ण ऊसाचे गाळप करणे बाबत कारखान्यांना सुचित करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चारकोप, कांदिवली (मुंबई) येथील कांदळवन क्षेत्रात होणाऱ्या वाढत्या अतिक्रमणाबाबत**

**(७) * ४९७८५ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदिवली (पश्चिम) येथील चारकोप सेक्टर ८ व ९ या भागात खारफुटी शिल्लक असून ती संरक्षित वनक्षेत्र म्हणून घोषित करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी असलेल्या चारकोप पोलीस ठाण्याच्या मागील खारफुटीत अनेक वर्षापासून अवैध बांधकाम करुन अतिक्रमण केले जात असल्याचे आढळून आले असून यासंदर्भात महानगरपालिका, वन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय यांनी वारंवार कारवाई करुनही येथे पुन्हा नव्याने अवैध झोपड्या, गोदाम, गाळे उभारुन ते विकल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याठिकाणी मुख्यत: पावसाळ्यात शासकीय यंत्रणा कारवाई करण्यास येणार नसल्याने खारफुटीची कत्तल करुन नवीन अवैध बांधकामे केली जातात, शासकीय यंत्रणांनी वेळीच लक्ष न दिल्यास ही बांधकामे वाढण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदरहू कांदळवन क्षेत्रात होणाऱ्या अतिक्रमणावर कारवाई करुन पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने संरक्षित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे अंशत: खरे आहे.

मौजे चारकोप स.क्र. ४१, न.भू. क्र.३, चे ०.४३०४ हे. क्षेत्र व सर्व्हे क्र.३९, न.भू.क्र. ४ चे ३६.१९ हे. क्षेत्र, न.भू. क्र. ६५९ (नवीन) चे ५.३३ हे. क्षेत्र, न.भू. क्र. ६६० (नवीन) चे ३.३८ हे. क्षेत्र शासन अधिसूचना दिनांक २३.०३.२०२१ द्वारे भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम २० अंतर्गत राखीव वन म्हणून आणि न.भू.क्र. ३ अ/१ चे क्षेत्र ५०.४८९६ हे. क्षेत्र शासन अधिसूचना दिनांक ७.०३.२०१९ द्वारे सदर अधिनियमाच्या कलम ४ अंतर्गत राखीव वन म्हणून घोषित केले आहे.

(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

अधिसूचित कांदळवनामध्ये खारफुटीची कत्तल करुन नवीन बांधकाम निदर्शनास आलेले नाही. तथापि, मौजे चारकोप येथील चारकोप पोलीस ठाण्याच्या मागील बाजूस अधिसूचित कांदळवन क्षेत्रापासून ५० मी. च्या बफर झोन मध्ये झोपडयांचे अतिक्रमण निदर्शनास आले आहे.

मुंबई कांदळवन संधारण घटक विभागाच्या अखत्यारीत असलेल्या अधिसूचित राखीव कांदळवन क्षेत्रात अतिक्रमण होऊ नये तसेच कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन होण्याकरिता अधिसूचित कांदळवन क्षेत्राच्या हद्दीवर संरक्षक भिंत व तारेच्या कुंपणाचे काम सुरु आहे. अधिसूचित राखीव कांदळवन क्षेत्राच्या संरक्षणाकरिता क्षेत्रिय कर्मचारी तसेच महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांद्वारे गस्त घालण्यात येते. तसेच ५० मी. बफर झोन मधील शासकीय मिळकतीस संरक्षक भिंत बांधण्याबाबतचा प्रस्ताव महसूल विभागाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेंतर्गत शेतकऱ्यांची यादी अद्ययावत करण्याबाबत**

**(८) * ५०२८९ श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १५२ लाख शेतकरी कुटुंब असताना पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी (पीएम किसान) योजनेसाठी फक्त ११५ लाख शेतकऱ्यांची नोंदणी झाल्यामुळे उर्वरित ३७ लाख शेतकरी कुटुंब या योजनेसाठी पात्र की अपात्र असा शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील लाखो शेतकऱ्यांना पोर्टल मधील तांत्रिक बिघाडाचे कारण सांगुन पंतप्रधान किसान सन्मान योजनेपासून वंचित ठेवल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पीएम किसान योजनेद्वारे अल्पभूधारक शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्नाचा स्त्रोत म्हणून केंद्र शासनाकडून दोन हजार रुपये सन्मान निधी दिला जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यासंदर्भात केंद्र शासनाने सर्व राज्य शासनांना पीएम किसान योजनेअंतर्गत सर्व नावे निश्चित करुन यादी अद्ययावत करण्यासाठी दिनांक १५ डिसेंबर, २०२२ पर्यंतची मुदत दिलेली असताना शासनाने यादी अद्याप निश्चित केली नसल्याचेही दिनांक १७ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी लाखो पात्र शेतकरी पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी (पीएम किसान) योजनेपासून वंचित राहणार असल्याने पात्र शेतकऱ्यांची यादी अद्ययावत करण्याची मुदत लक्षात घेऊन, शासनाने सदर योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, तसेच त्याचे स्वरुप काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) होय, हे अशंत: खरे आहे.

कृषि गणना २०१५-१६ नुसार राज्यात एकुण १५२.८५ लाख खातेदार संख्या असून दिनांक २.१२.२०२२ अखेर त्यापैकी ११५.५५ लाख शेतक-यांनी पी.एम.किसान योजनेसाठी नोंदणी केलेली आहे. राज्यातील उर्वरीत पात्र शेतक-यांची नोंदणी करून संपृक्तता साध्य करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

तसेच केंद्र शासनाने PM-KISAN Portal वर शेतकऱ्यांना नोंदणी करण्यासाठी Farmer corner या Tab मधुन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर सुविधे अंतर्गत शेतकरी CSC केंद्रावर किंवा स्वत: योग्य त्या कागदपत्रांआधारे नोंदणी करत आहेत.

(२) हे, खरे नाही.

(३) होय, हे अशंत: खरे आहे.

शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न मिळण्याकरीता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM KISAN) योजना सुरु केली आहे. सदर योजना राज्यात दिनांक १.१२.२०१८ पासून राबविण्यास मान्यता प्रदान करण्यात आली असुन सदरील योजनेंतर्गत केंद्र शासनाकडील दिनांक ०७ जून २०१९ चे पत्रानुसार क्षेत्र धारणेची मर्यादा न ठेवता सरसकट सर्व पात्र शेतकरी कुटुंबांना रुपये २०००/- प्रती हप्ता या प्रमाणे ३ हप्त्यात रुपये ६०००/- प्रती वर्षी विहित निकषांचे अधीन

राहून लाभ देण्यात येत आहे.

(४) होय, हे अशंत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या दिनांक १४ जून २०२२ रोजीच्या पत्रातील संपृक्तता साध्य करण्याच्या निर्देशाप्रमाणे दिनांक १५ डिसेंबर २०२२ अखेर उर्वरीत पात्र लाभार्थ्यांची नोंदणी करणे, अपात्र लाभार्थ्यांची माहिती पोर्टलवरून कमी करणे व योजनेचे लाभार्थी अंतिम करण्याच्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) मा. मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १८ ऑगस्ट २०२२ रोजीच्या तसेच मा. मंत्री महसूल व मा. मंत्री कृषी यांच्या दिनांक २३ ऑगस्ट २०२२ रोजीच्या बैठकातील निर्देशांप्रमाणे डाटा अपलोड करण्याचे कामकाज महसूल विभागाने पूर्ण करण्याचे व प्रलंबित डाटा दुरुस्तीचे कामकाज महसूल, कृषी व ग्रामविकास विभाग यांनी सर्व समन्वयाने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य स्तरीय प्रकल्प आढावा समितीची दिनांक २.९.२०२२ रोजी झालेल्या बैठकीत केंद्र शासनाने दिलेल्या सूचनांनुसार विहित मुदतीत काम पुर्ण करण्याच्या सूचना क्षेत्रिय यंत्रणांना देण्यात आल्या असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विदर्भातील झाडे समुहातील जातींच्या लोकांना एन.टी. मधील “सी” चे जात प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

**(९) * ५११११ डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील झाडे कुणबी, झाड्या, झाडे कोकू इत्यादी झाडे समुहातील जातींच्या लोकांना एन.टी. मधील “सी” चे जात प्रमाणपत्र मिळण्याबाबत इतर मागास बहुजन कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १३ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती, तसेच एन.टी.सी. चे जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर दिनांक ५ नोव्हेंबर, २०२२ रोजी मोर्चा काढून उपोषण व आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बैठकीमध्ये प्रधान सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांनी भटक्या जमाती ‘क’ अंतर्गत ‘’झाडे’’ या उप जमातीची नोंद असल्याचे सांगितले असून देखील अनुसूचित जमातीचे जातीचे प्रमाणपत्र देण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले व त्यात प्रधान सचिव (इतर मागास बहुजन कल्याण विभाग) यांनी भटक्या जमाती ‘क’ अंतर्गत ‘’झाडे’’ या उप जमातीची नोंद असल्याचे सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात राज्य मागासवर्ग आयोगामार्फत तपासून त्यांच्या अहवालाप्रमाणे कार्यवाही करण्याचे आश्वासन शासनाने देऊनही अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याने झाडे समुहातील जातीमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणाची चौकशी करुन झाडे या समुहातील जातीना एन.टी. मधील “सी” चे जात प्रमाणपत्र देण्याबाबत व समाजाला आरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) हे खरे आहे.

(२) ते (५) भटक्या जमाती “क” अंतर्गत झाडे या उप जमातीची नोंद आहे. तसेच झाडे कुणबी, झाडया, झाडे कोकू या उपजमातीची नोंद भटक्या जमाती “क” प्रवर्गामध्ये नाही. झाडे कुणबी, झाडया, झाडे कोकू या उपजमातीच्या संदर्भात तपासणी करून अहवाल सादर करण्याबाबत महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगास कळविण्यात आले असून आयोगाचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

-----------------

**राज्यात सर्व जिल्ह्यातील खरीप हंगामात नुकसान झालेल्या विमाधारक शेतकऱ्यांना संबंधित विमा कंपन्यांकडून नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(१०) * ४९५३९ श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अमित झनक (रिसोड), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून त्यापासून संरक्षण मिळण्यासाठी अस्तित्वात असलेल्या पिक विमा योजनेचा शेतकऱ्यांना गत अनेक वर्षापासून पूर्ण लाभ मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात व नियमितरित्या विम्याचा हप्ता भरणा होत असतानाही विमा कंपन्यांच्या जाचक अटी, तांत्रिक त्रुटीमुळे अनेक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई नाकारण्यात आली वा अल्प प्रमाणात देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक ठिकाणी शेतकऱ्यांच्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे न होणे, तसेच प्रत्यक्ष शेतात जाऊन सर्वेक्षण न करताच नुकसानीची त्रोटक माहिती भरणे व शेतकऱ्यांच्या बनावट स्वाक्षऱ्या देखील करण्यात आल्याचे अनेक प्रकरणात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विमा कंपन्यांनी ७२ तासात जिओ टॅगींग केलेल्या शेतकऱ्यांनाच विमा संरक्षण देणे, परंतु अनेक शेतकऱ्यांकडे ॲन्ड्रॉईड फोन नसणे, तर बऱ्याच ठिकाणी नेटवर्क नसल्यामुळे योजनेत सहभागी व मदतीस पात्र असतानाही केवळ विमा कंपन्यांना मुदतीत सूचना न दिल्यामुळे आणि टॅगींगअभावी अनेक शेतकरी नुकसान भरपाईपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी दिनांक ०५.०९.२०२२ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने ७२ तासाची पुर्वसूचना देण्याची अट अन्यायकारक असल्याचा निर्वाळा देवून हा कालावधी तीन आठवड्याचा करण्याबाबत आदेशित केले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, अनेक गावांतील शेतकऱ्यांच्या ऑफलाईन तक्रारींचे रजिस्टर देखील उपलब्ध नसणे, तसेच दीड लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांच्या ऑनलाईन तक्रारी सर्व्हेअभावी ॲपवर प्रलंबित राहिल्यामुळे शेतकरी मदतीपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, या संपूर्ण गंभीर प्रकरणाची शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना विमा कंपन्यांकडून कालबध्द पध्दतीने नुकसान भरपाई मिळवून देण्यासंदर्भात तसेच विमा कंपन्यांच्या मनमानी कारभारावर आळा घालण्यासंदर्भात कोणती

कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे अंशत: खरे आहे.
तथापि, याबाबत काही तक्रारी प्राप्त झाल्या असुन प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने योग्य ती नियमोचित कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(४) हे खरे नाही.
(५) हे खरे नाही.
(६) हे खरे नाही.
(७) प्रधानमंत्री पिक विमा योजना ही केंद्र शासनाची योजना असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यात खरीप हंगाम २०१६ पासून राबविण्यात येत आहे. खरीप २०१६ ते रब्बी २०२१-२२ मध्ये ७१९.२८ लाख शेतकरी अर्जदारांनी सहभाग घेवुन ४११.६५ लाख हे. क्षेत्र विमा संरक्षित केले होते. त्यानुसार ३२४.८८ कोटी शेतकरी अर्जदारांना रक्कम रुपये १९४३८.४९ कोटी निश्चित करण्यात आले आहेत.
योजनेंतर्गत खरीप २०२२ मध्ये एकूण ९६.६१ लाख शेतकरी अर्जदारांनी सहभाग घेतला असून दिनांक ०५.१२.२०२२ अखेर एकूण ५०.९८ लाख शेतकरी अर्जदारांना रक्कम रु.२३१६.४० कोटी इतकी नुकसान भरपाई निश्चित झाली असून त्यापैकी ३७.९५ लाख शेतकऱ्यांना रु.१८१६.५१ कोटी नुकसान भरपाईचे वाटप विमा कंपनीमार्फत करण्यात आले असून उर्वरित नुकसान भरपाई निश्चिती व वाटपाची कार्यवाही सुरु आहे. तसेच योजने अंतर्गत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने योग्य ती नियमोचित कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मेळघाटातील धारणी व चिखलदारा (जि.अमरावती) येथे रोजगार हमी योजनेच्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(११) * ५२२११ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेळघाटातील धारणी (जि.अमरावती) येथे सन २०१६-१७ व २०१८ या आर्थिक वर्षासाठी मंजूर असलेल्या रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून पांदण रस्त्यांच्या ४८ कामांमध्ये बनावट कागदपत्रांच्या आधारे ५ कोटी रुपयांचा अपहार केल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच चिखलदरा (जि.अमरावती) येथे सन २०१६-१७ या कालावधीत पंचायत समिती अंतर्गत रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून पांदण रस्त्यांची कामेही निकृष्ट दर्जाची व अर्धवट करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रलंबित असलेली धारणी व चिखलदरा येथील पांदण रस्त्यांची कामे प्राधान्याने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
मा. आयुक्त (नरेगा), नागपूर यांचे पत्र क्र.१४३० दिनांक २४/०९/२०१८ अन्वये सन २०१६-१७ मधील ४६ रस्ता कामाची तपासणी बाबत चौकशी समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर समितीला निकषानुसार कामे केली

नसल्याची चौकशी दरम्यान आढळून आले आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

काही कामे अर्धवट झाल्याचे तसेच काही कामे निकषानुसार झाली नसल्यास तपासणी समितीच्या अहवालात निष्पन्न झाले आहे.

(३) व (४) धारणी तालूक्यातील रस्ते कामाबाबत चौकशी समिती गठित करण्यात आली व त्याबाबत अंतिम अहवाल मा.विभागीय आयुक्त, अमरावती व मा.आयुक्त (नरेगा), नागपूर यांना सादर करण्यात आला. मा.आयुक्त (नरेगा), नागपूर यांचे पत्र क्र.१८८५ दिनांक ०९ ऑगस्ट, २०२१ अन्वये सदर अनियमिततेला जबाबदार १३ कंत्राटी कर्मचारी यांची सेवा समाप्त करण्यात आली व २२ नियमीत कर्मचारी यांचे जोडपत्र (१ ते ४) संयुक्त चौकशी करीता शासनास सादर करण्यात आले.

चिखलदरा तालूक्यातील रस्ते कामाबाबत विभागीय आयुक्त, अमरावती यांचे स्तरावरून समिती गठित करण्यात आली व त्याबाबत अंतिम अहवाल मा.विभागीय आयुक्त, अमरावती यांना सादर करण्यात आला मा.विभागीय आयुक्त यांनी सुनावणी अंती कामांच्या देयकांना शिफारस नाकारली.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गेवराई (जि.बीड) येथील वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत मंजूर असलेली कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याबाबत

**(१२) * ५०९८९ श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) येथील जवळपास ३५ तांड्यांच्या विकास कामांसाठी दिनांक २० मे, २०२२ च्या शासन आदेशाने वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत तीन कोटी ३४ लक्ष ७७ हजार रुपयांची सिमेंट रस्ता व नाला बांधकामाची कामे मंजूर झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त सर्व कामे एकाच एजन्सीला देण्यात येवून कुठलेच काम न करता दिनांक २५ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास सदर एजन्सीने ४०% निधी उचलला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गटविकास अधिकारी, पंचायत समिती गेवराई यांच्या उपस्थितीत दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास विजय नगर व जोहूर तांडा तालुका गेवराई येथे कामांना सुरुवात करुन ती अत्यंत निकृष्ट दर्जाची करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना सर्वच ३५ कामांच्या सद्य:स्थितीची माहिती लेखी स्वरुपात उपलब्ध करुन देण्याची मागणी करुनही लोकप्रतिनिधींना माहिती उपलब्ध करुन दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू कामांबाबत गुण नियंत्रक विभागाचा अहवाल आल्याशिवाय कोणत्याच कामाचे देयक संबंधित एजन्सीला न देण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) व (२) होय.

योजनेंतर्गत प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर निधी वितरण करतांना काम सुरु करण्यापुर्वी अग्रीम रक्कम ४०%, संबंधीत गटविकास अधिकारी व उपअभियंता यांनी काम प्रगतीपथावर असल्याबाबतचे पुरावे सादर केल्यानंतर ४०% रक्कम आणि उर्वरित २०% रक्कम ही कामाच्या पुर्णत्वाचा दाखल्यासह गुण नियंत्रक यांचा तपासणी अहवाल, पूर्ण झालेल्या कामाचे छायाचित्र इ. कागदपत्रांसह गट विकास अधिकारी यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर अदा करण्यात येते. दिनांक २०/०५/२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार गेवराई तालुक्यातील ३४ कामांचा ४०% निधी संबंधित ग्रामपंचायतीच्या तांडा वस्ती सुधार योजनेच्या खात्यात अग्रिम म्हणून वर्ग करण्यात आला आहे.

सदर ३४ कामांपैकी ५ कामे सुरु करण्यात आलेली असून उर्वरित कामे अद्यापि सुरु झालेली नाहीत.
(३) व (४) नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खानदेशात केळी उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(१३) * ४९४९६ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खानदेशात केळी हे मुख्य पिक असून त्यावर कुकंबर मोझॅक विषाणूने (सीएमव्ही) व इतर वेगवेगळया रोग व किडींचा प्रादुर्भाव, नैसर्गिक आपत्ती तसेच तापमानातील बदल यामुळे केळी उत्पादन शेतकऱ्यांचे तब्बल २२० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच मुक्ताईनगर, रावेर व बोदवड (जि.जळगांव) तसेच शेजारील यावल, भुसावळ व जामनेर या तालुक्यांमध्ये केळी संशोधन व तंत्रज्ञान प्रसार केंद्र स्थापन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे करुनही याबाबत अद्यापपर्यंत कोणताही निर्णय घेतला नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने पिकांचे पंचनामे केले आहेत काय, तसेच शेतकऱ्यांना थेट अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) हे अंशत: खरे आहे.
सी.एम.व्ही मुळे एकूण ८७७०.८५ हेक्टर क्षेत्र बाधीत झाले आहे.
(२) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत जळगाव येथे अखिल भारतीय समन्वयीत केळी संशोधन केंद्र सन १९६९ पासून कार्यान्वित आहे. या संशोधन केंद्रामार्फत राज्यातील केळी उत्पादकांना तंत्रज्ञानाबद्दल मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात येत असून जळगाव येथील या संशोधन केंद्राचा फायदा जळगाव जिल्ह्यातील आसपासच्या परिसरातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना होत आहे.
जळगाव येथील केळी संशोधन केंद्र हिंगोणा, ता. यावल येथे स्थलांतरीत करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी विनंती केली होती. तथापि, केळी संशोधन केंद्र, जळगाव येथून हिंगोणे, ता. यावल याठीकाणी स्थलांतरीत करणे उचित ठरणार नाही, असे अभिप्राय संशोधन संचालक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांनी दिले आहेत.
(३) होय, पिकाचे संयुक्त पंचनामे करण्यात आले आहेत. बाधित क्षेत्राला मदत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पेण (जि.रायगड) येथील को.ओपरेटीव्ह अर्बन बँकेतील ठेवीदारांना न्याय मिळण्याबाबत**

**(१४) * ५४२५६ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) येथील को.ऑप. अर्बन बँकेचे ७५८ कोटी व मेटल स्क्रॅप ट्रेडिंग कार्पोरेशनचे रुपये ४८० कोटी अशा एकूण १ हजार २३८ कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराप्रकरणी कित्येक वर्षानंतरही हजारो ठेवीदार पैसे परत मिळण्यासाठी अद्यापही संघर्ष करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कर्जदाराकडून अद्यापही कोट्यवधींची वसुली प्रलंबित असल्यामुळे ठेवीदारांची देणी मिळण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार ठेवीदारांची देणी सत्वर परत करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) अंशत: खरे आहे.

पेण अर्बन को-ऑप. बँकेचे सन २००८ ते २०१० या कालावधीकरीता करण्यात आलेल्या लेखापरिक्षणामध्ये बँकेत रु.५९८ कोटी इतक्या रक्कमेचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले. त्यानुषंगाने पेण पोलीस ठाणे येथे बँकेचे संचालक/ कर्मचारी/बँकेचे लेखापरीक्षक अशा एकूण ४१ व्यक्तींविरुध्द गुन्हा क्र. ३४/२०११ दाखल करण्यात आला आहे. तसेच बँकेतील गैरव्यवहाराची चौकशी करण्याकरीता दोषी संचालकांविरुध्द अधिनियमाच्या कलम ८८ अन्वये सेवानिवृत्त न्यायाधिश यांची प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

बँकेचे तत्कालीन अध्यक्ष यांच्याशी संबंधीत मे. उष्मा ज्वेलरी ॲण्ड पॅकेजींग प्रा. लि. यांनी मेटल स्क्रॅप ट्रेडींग कार्पोरेशन लि. यांचेकडून रु.१०३.४६ कोटी इतके कर्ज घेतले आहे. सदर कर्जासाठी बँकेच्या पैशातून खरेदी केलेल्या मालमत्ता गहाण ठेवण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत सदर मालमत्तांवर मेटल स्क्रॅप ट्रेडींग कार्पोरेशन लि. या कंपनीचा बोजा चढविण्यात आलेला आहे.

बँकेच्या एकूण १,९७,२२३ ठेवीदारांच्या रु. ७३८.३९ कोटी इतक्या ठेवी असून त्यापैकी ३८,५७४ ठेवीदारांच्या रु.५८.८४ कोटी इतक्या रक्कमेच्या ठेवी परत करण्यात आल्या आहेत. सध्यस्थितीत १,५८,६६९ ठेवीदारांच्या रु.६११.१७ कोटी एवढ्या रक्कमेच्या ठेवी परत करणे बाकी आहे.

(२) व (३) दिनांक ०३.२०२२ अखेर बँकेची रु.७९५.८६ कोटी एवढ्या रक्कमेची कर्जवसूली बाकी असून त्यापैकी रुपये ७३९.१७ कोटींची बोगस कर्जे आहेत. दिनांक ३०.११.२०२२ अखेर कलम १०१ अन्वये ४८५३ प्रकरणांमध्ये रुपये १४८.६१ कोटी एवढ्या रक्कमेची वसूली करण्यात आली आहे.

बँकेचे अध्यक्ष/संचालक यांनी ठेवीदारांच्या ठेवीतून खरेदी केलेल्या १४३ मालमत्ता महाराष्ट्र ठेवीदार हित संरक्षण (एम.पी.आय.डी.) अधिनियम १९९९ मधील तरतूदीनुसार जप्त केल्या असून उपविभागीय अधिकारी, पेण यांच्या ताब्यात आहेत.

सदर मालमत्तांची विल्हेवाट लावण्यासाठी मा. विशेष सत्र न्यायालय, रायगड-अलिबाग येथे दाखल खटला मा. पी.एम.एल.ए. स्पेशल कोर्ट, बृहन्मुंबई यांचेकडे वर्ग करण्यात आला असून त्यानुषंगाने पी.एम.एल.ए. कोर्टात सुनावणी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील वागळे इस्टेट परिक्षेत्रात श्रीनगर भागातील निवासी जमिनीवरील सातबाऱ्यावरील खासगी वने ही नोंद कमी करण्याबाबत

**(१५) * ४९८७१ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील वागळे इस्टेट परिक्षेत्रात श्रीनगर भागातील निवासी जमिनीवरील सातबाऱ्यावर खाजगी वने अशी नोंद

असल्याने मोडकळीस आलेल्या शेकडो इमारतींचा पुनर्विकास रखडल्याने मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार सातबाऱ्यावरील खाजगी वने नोंद कमी करुन संबंधित भोगवटादारांची नावे त्यात समाविष्ट करण्यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व जिल्हाधिकारी तसेच तहसिलदार, ठाणे यांच्याकडे दिनांक १० आक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांना दिनांक १८.०९.२०२१ रोजी निवेदन दिले आहे.
(२) व (३) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ३०.०१.२०१४ रोजीच्या आदेशानुसार वन विभागाने दिनांक १२.१२.२०१४ च्या पत्रान्वये आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले होते. तदनंतर जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक २९.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये मौजे पाचपाखडी, ता. ठाणे, जि. ठाणे येथील स. नं. ४३०, क्षेत्र १६-३३.० हे. आर व स. नं.४३२ क्षेत्र २७-३०.० हे. आर या जमिनीचे गाव नमुना नं. ७/१२ उताऱ्यावरील भोगवटदार सदरी असलेले "महाराष्ट्र शासन राखीव वने" नोंद कमी करुन इतर अधिकारातील खातेदारांची नावे भोगवटदार सदरी घेणेबाबत तहसिलदार, ठाणे यांना कळविले आहे. त्यानुसार तलाठी, साझा पांचपाखाडी, ता. जि. ठाणे यांनी फेरफार क्र. ४६५८, दिनांक ०६.१२.२०२२ अन्वये उक्त जमिनीच्या गाव नमुना नंबर ७/१२ उताऱ्यावरील भोगवटदार सदरी असलेली "महाराष्ट्र शासन राखीव वने" ही नोंद कमी करून इतर अधिकारातील खातेदारांची नावे भोगवटदार सदरी दाखल केली आहेत.

-----------------

### राज्यातील 'ई पीक पाहणी' या ॲपबाबत शेतकऱ्यांमध्ये संभ्रम वाढला असल्याबाबत

**(१६) * ५००१६ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पिकांची नोंद ऑनलाइन करण्यासाठी जमाबंदी आयुक्तालयाने "ई पीक पाहणी" हे ॲप सुरू केले असून सातबारा उताऱ्यावरील ही नोंद अधिकृत असणार असून, त्यात सर्वच पिकांचा समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, साखर आयुक्तालयाने "ई पीक पाहणी" ॲपमध्ये यावर्षी ऊसाची नोंदही करण्यात येणार असल्याबाबतचे परिपत्रक काढले, परंतु साखर आयुक्तालयाने 'महाऊस' हे नवीन ॲप सुरु करून, ऊस उत्पादकांनी याच ॲपवर नोंद करावी, असे आदेश काढल्याचे दिनांक १ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पिकांसाठी दोन ॲप सुरु करण्यात आल्यामुळे नेमके कोणते वापरावयाचे याबाबत शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) हे खरे आहे. ई-पीक पाहणी मोबाईल ॲप हे शेतकऱ्यांनी स्वतःहून गांव नमूना नंबर १२ वर नोंदवण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. या ॲपचा वापर करून शेतकऱ्यांनी केलेल्या नोंदी या स्वयंप्रमाणित मानुन गांव नमूना नंबर १२ वर प्रतिबिंबित होतात. खरीप २०२२ हंगामामध्ये राज्यात एकूण ३,२५,३७५.४७ हेक्टर क्षेत्रावर ऊसाची नोंद ई-पीक पाहणी ॲपद्वारे झालेली आहे.

साखर आयुक्तालयाकडून उपलब्ध करून देण्यात आलेले महाऊस हे मोबाईल ॲप केवळ शेतकऱ्यांना त्यांचा ऊस विक्रीसाठी कोणत्या कारखान्याकडे नोंद करायचा आहे यासाठी उपलब्ध करून दिलेले आहे. त्यामध्ये शेतकऱ्यांना तीन साखर कारखान्यांकडे विक्रीसाठीचे नोंदीचे पर्याय उपलब्ध करून दिलेले आहे. त्यामुळे उपरोक्त दोन्ही मोबाईल ॲपचा उद्देश वेगळा आहे व महाऊस ॲप हे ई- पीक पाहणी मोबाईल ॲपला पर्याय म्हणून वापरता येणार नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात परतीच्या पावसामुळे कपाशीवर लाल्या व बोंडअळी रोगांचा प्रादुर्भाव झाल्याबाबत

**(१७) * ५०२०७ श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वत्र विशेषत: नाशिक, लातूर, जळगाव, अकोला, नांदेड तसेच जालना जिल्ह्यात परतीच्या पावसामुळे कपाशीवर मोठ्या प्रमाणात लाल्या व बोंडअळी रोगांचा प्रादुर्भाव झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कपाशी पिकांसाठी महाग बियाणे, रासायनिक खते, खुरपणी, कोळपणी, कुळवांच्या पाळ्या व किटकनाशक फवारणी आदीसाठी एका बॅगेला दहा ते बारा हजार रुपये खर्च येत असून उत्पादन खर्च देखील यातून निघत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) अंशत: खरे आहे.

नाशिक, जळगाव, जालना व जळगांव जिल्हयात गुलाबी बोंडअळीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून आला.

लातूर व अकोला जिल्हयात लाल्या व बोंडअळी या रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला नाही.

(२) व (३) जालना जिल्हयात सप्टेंबर-ऑक्टोबर, २०२२ मध्ये अल्प प्रमाणात गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव निदर्शनास आला. प्रादुर्भावग्रस्त क्षेत्रावर प्रेफेनोफॉस ५० इसी १६७४ लि. व इमामेक्टीन बेंझोएट ५ टक्के एस.जी.१६७ किलो. ५० टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

कृषि सल्ला, ग्रामस्तरावरील बैठका, शास्त्रज्ञ मार्गदर्शन, भित्ती पत्रके इ.द्वारे ग्रामस्तरावरील गुलाबी बोंडअळी नियंत्रणाबाबत जनजागृती करण्यात आलेली आहे.

तसेच कापूस उत्पादक सर्व जिल्हयामध्ये मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली किडरोग व्यवस्थापनासाठी जिल्हास्तरीय समिती स्थापन करुन जिल्हयातील कृषि निविष्ठा विक्रेते व कृषि सेवा केंद्र इ.च्या बैठका आयोजीत करण्याबाबत तसेच वेळीच किड रोग व्यवस्थापनासाठी योग्य नियोजन करुन प्रादुर्भाव नियंत्रणात ठेवण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाजवळील वाडा खाडकोन (जि. पालघर) गावात भूमाफियांकडून बेकायदेशीर उत्खनन होत असल्याबाबत

**(१८) * ५३३२० श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाजवळील वाडा खाडकोन (जि. पालघर) या महसूली गावात गट क्रमांक ७५ आणि ७६ मधील सुमारे आठ एकर जागेतील खाणीतून कोट्यवधी रुपयांची रॉयल्टी बुडवून लाखो ब्रास दगडांचे बेकायदेशीर उत्खनन करण्यात येत असल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी स्थानिक नागरिकांनी सन २०१७ ते २०२० या कालावधीमध्ये जिल्हाधिकारी यांचेकडे तक्रार करुनही यावर कोणतीच कार्यवाही न करता, अद्यापही लाखो ब्रास दगडांचे उत्खनन व बेकायदेशीर विक्री करुन कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने चौकशीनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) (२) (३) व (४) मौजा वाडा खाडकोन (जि. पालघर) या महसूली गावात गट क्र.७५ मध्ये उत्खनन झालेले नाही. तक्रारदार यांच्याकडून गट क्र.७६/२ मध्ये जमिनीमध्ये गौणखनिजाचे अवैध उत्खनन केल्याबाबत तक्रार प्राप्त झाली. त्यानुषंगाने चौकशी अंती सदर गटामध्ये अनाधिकृतपणे दगड उत्खनन केल्याबाबतची बाब निदर्शनास आल्याने तहसिलदार, पालघर यांनी एकूण ६०२४ ब्रास अनाधिकृत गौण खनिज उत्खनन केल्याच्या अनुषंगाने संबंधितास दिनांक ०२.१२.२०२२ रोजी जमिन महसूल संहिता १९६६ मधील तरतुदीन्वये रूपये ३,४०,०५,४८०/- रकमेचे दंडात्मक आदेश पारीत केले आहेत.

-----------------

## नांदेड जिल्हयात अवैध गौण खनिजाचे उत्खनन होत असल्याबाबत

**(१९)** * **५४५४८ श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यात वाळू व अन्य गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या वाहनांना जीपीएस बसविणे आवश्यक असताना सदर नियमांचे उल्लंघन करून शेकडो वाहनांद्वारे गौण खनिजाची वाहतूक केली जात असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, राज्यात रेती घाटाची लिलाव पद्धत बंद असल्याचा गैरफायदा घेऊन देगलूर (जि.नांदेड) येथे वाळू मफिया व प्रशासनातील अधिकारी यांच्या संगनमताने अवैध गौण खनिज उत्खनन सुरू असल्याचेही माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी नांदेड जिल्हयात जिल्हा स्तरावर उपविभागीय अधिकारी व तहसिलदार स्तरावर भरारी व बैठे पथके तयार करण्यात आली आहेत.

नांदेड जिल्हयात माहे एप्रिल ते ऑक्टोबर, २०२२ अखेर अवैध उत्खननबाबत एकूण १३३ वाहनावर कारवाई करून रू.१,५४,८६,०००/- इतका दंड वसूल करून शासनखाती जमा करण्यात आला आहे. तर देगलूर तालुक्यात दिनांक ०१.०४.२०२२ ते माहे ऑक्टोबर, २०२२ अखेर एकूण २३ वाहनावर कारवाई करून रू.४७,६५,८७५/- ऐवढा दंड वसूल केला आहे. तसेच ८ वाहने जप्त करून ५ गुन्हे देखील दाखल करण्यात आले आहेत.

नांदेड जिल्हयातील गोदावरी, वैनगंगा, मांजरा व लेंडी या नदी पात्राच्या क्षेत्रात अवैध रेती उत्खनन, साठवणूक व वाहतूक होऊ नये यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १९७३ चे कलम १४४ लागू करण्यात आले आहे.

-----------------

## मुंब्रा, दिवा, कोपरखाडी व मोठागाव बंदर (जि.ठाणे) येथील खाडीतून अवैधरित्या रेती उत्खनन केल्याबाबत

**(२०) * ५००२२ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील मुंब्रा, दिवा, कोपरखाडी, मोठागाव बंदर येथील खाडीतून रेती माफिया सक्शन पंपानी अवैधरित्या रेतीचे उत्खनन करीत असल्याचे दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणच्या सततच्या रेतीच्या अवैध उत्खननामुळे खाडीतील जैव विविधतेला धोका निर्माण झाला आहे तसेच शासनाचा महसूल देखील बुडविला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने खाडी समुद्रातून अवैधरित्या उपसा करणाऱ्या रेती माफियांवर कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) ठाणे जिल्ह्यातील गौण खनिजाचे अवैध उत्खननास व वाहतूकीस आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत दक्षता पथकची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, महसूल, परिवहन व पोलिस यांच्या संयुक्त पथकामार्फत वेळोवेळी कारवाया करण्यात येतात. दिनांक ११/१०/२०२२ रोजी मौजे मोठागांव, ठाकुर्ली कोपर दिवा खाडी मुंब्रा बंदर येथे कारवाई करुन ७ सक्शन पंप व ६ बार्ज नष्ट केले आहेत. ठाणे जिल्ह्यामध्ये जानेवारी, २०२२ ते नोव्हेंबर,२०२२ अखेरपर्यंत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूक प्रकरणी जप्त केलेल्या साहित्याची अंदाजित रक्कम रु.१४.१८ कोटी इतकी आहे. तसेच, ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात सर्वच जिल्ह्यात सोयाबीन पिकांवरील रोगांच्या प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान

**(२१) * ५००९० श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय बनसोडे (उदगीर), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्व जिल्ह्यात यावर्षी माहे जुलै, २०२२ मध्ये व त्यादरम्याच्या प्रारंभापासून सतत पाऊस तसेच सोयाबीनवर पिवळा मोझॅक, सोयाबीन मोझॅक व करपा या रोगांमुळे तसेच गोगलगाईच्या प्रादुर्भावामुळे सोयाबीन पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सोयाबीन पिकांवर वेळोवेळी फवारणी करुनही पिकांवरील किड कमी न झाल्याने तसेच शंखी गोगलगाय प्रादुर्भावामुळे लागलेला खर्च देखील भरुन निघण्याची शक्यता नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, काही शेतकऱ्यांनी स्वत:च्या शेतातील पिके नष्ट केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, काही ठिकाणी महसूल मंडळाचे अतिवृष्टीग्रस्त यादीतून सहा कृषी मंडळांना वगळण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणे व पिकांवरील रोग नियंत्रणाकरिता कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) अंशत: खरे आहे.

खरीप हंगाम २०२२ मध्ये जून ते ऑक्टोबर, २०२२ कालावधीत अतिवृष्टी, पुर, सततचा पाऊस यामुळे शेती/फळपिकाखालील राज्यात एकूण ६६.३१ लाख हे.क्षेत्र बाधित झालेले आहे. या बाधित क्षेत्रासाठी महसूल व वन विभागाकडून रू.६०३९.५२ कोंटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

सोयाबीन पिकावर शंखी गोगलगायीच्या प्रादुर्भावामुळे ५ जिल्ह्यात एकूण ७२,५३४ हे.क्षेत्र बाधित झालेले आहे. याकरीता महसूल व वन विभागाकडून रू.९८५८.८० लाख इतका निधी उपलब्ध करून दिलेला आहे.

सोयाबीन पिकावर मोझॅक व करपा या रोगाचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून आलेला होता.

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

लातूर जिल्ह्यामध्ये औसा, शिरूर, अनंतपाळ व देवणी तालुक्यात काही शेतकऱ्यांनी पिके नष्ट केल्याचे दिसून आले

(४) हे अंशंत: खरे आहे.

अमरावती जिल्ह्यातील चांदूर बाजार तालुक्यातील तळेगाव मोहना व आसेगाव पुर्णा या दोन महसूल मंडळाच्या हवामान केंद्रावर अतिवृष्टी नोंद झालेली नव्हती. मात्र त्यानंतर शेतकऱ्यांचे आंदोलन व तक्रीरीनंतर हवामान केंद्राची तपासणी केली असताना सदर हवामान केंद्र सुस्थितीत आढळून आले नाही. त्यामुळे नजीकच्या हवामान केंद्रावरील पर्जन्यमानाची आकडेवारी विचारात घेऊन बाधित क्षेत्राचे पंचनामे करण्यात आले.

(५) खरीप हंगाम २०२२ मध्ये अतिवृष्टी/पुर/सततचा पाऊस तसेच शंखी गोगलगायीच्या प्रादुर्भावामुळे बाधित झालेले क्षेत्राकरिता मदत उपलब्ध करून देण्यात आली आहे.

पिकावरील किडरोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प अंतर्गत कृषि विद्यापिठाच्या माध्यमातून प्रशिक्षण देवून तसेच गाव बैठका, एसएमएस द्वारे शेतकऱ्यांना किड व रोगाबाबत उपाययोजनांची माहिती वेळोवेळी देण्यात आली आहे. त्यामुळे सोयाबीन पिकावरील किड रोगाचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसानीच्या पातळीच्या आत ठेवण्यास मदत झालेली आहे. तसेच राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत अनुदानित तत्वावर इमामेक्टीन बेन्झोएट, निंबोळी अर्क व प्रोफेनोफास इ. चा पुरवठा शेतकऱ्यांना करण्यात आला.

(६) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## राज्यात जंगली हत्तींनी शेत पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केल्याबाबत

**(२२) * ५०१८० श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: कोल्हापूर, सिंधुदूर्ग, गडचिरोली या जिल्ह्यात जंगली हत्ती शेतात घुसल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेत पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लेकुरबोडी (जि.गडचिरोली) गावात जंगली हत्तींच्या कळपाने एका ८० वर्षीय वृद्ध महिलेला दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास गंभीर जखमी केल्याचे तसेच तलवारगड (ता.कोरची, जि.गडचिरोली) येथील धनसिंग टेकाम यांना रानटी हत्तीने तुडवल्याने त्याचा मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई, जखमी व मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच हत्तींच्या कळपांचा बंदोबस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) महाराष्ट्र राज्यात वन्यहत्ती सिमावर्ती राज्यातुन जसे की कर्नाटकातून कोल्हापूर व सिंधुदूर्ग जिल्ह्यात तसेच छत्तीसगड राज्यातून गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यामध्ये प्रवेश करुन काही कालावधीकरीता राहून परत जातात.

गडचिरोली, वडसा, गोंदिया, चंद्रपूर व कोल्हापूर वन विभागात हत्तींच्या भ्रमणकाळात सन २०२२-२३ (दिनांक ०७.१२.२०२२ पर्यत) या कालावधीत शेतपिक नुकसानीच्या एकूण ९३९ घटना झाल्याचे निदर्शनास आले असून प्रचलित नियमातील तरतुदीनुसार संबंधित नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना एकूण रु. १२३.१० लक्ष इतके अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

(२) दिनांक २१.१०.२०२२ रोजी हत्ती लेकुरबोडी गावात आले असता खाटेवरुन उठतांना श्रीमती सनकुबाई कोलीराम नरेटी, रा. लेकुरबोडी या किरकोळ जखमी झाल्या होत्या व त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर सदर महिलेला रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे.

वन्यहत्तींच्या हल्ल्यामुळे सन २०२२ मध्ये ०२ मनुष्य हानीच्या घटना घडल्या आहेत. त्यामध्ये दिनांक ०४.१०.२०२२ रोजीच्या घटनेत श्री. सुरेद्र जेठू करईबाग, रा. तिडका यांचा व दिनांक ०४.११.२०२२ रोजीच्या घटनेत श्री. धनसिंग धर्मु टेकाम, रा. तलवारगड यांचा मृत्यू झाला आहे.

प्रस्तुत मनुष्य हानीच्या प्रकरणांमध्ये प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनसार रु. २० लक्ष प्रत्येकी अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

(३) मानव-वन्य हत्ती संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर खालील प्रमाणे उपायोजना करण्यात येतात.

- वनकर्मचारी व हंगामी संरक्षण मजूर यांचे गस्ती पथक / हाकारा गटाची स्थापना करण्यात आली आहे. सदर पथकांमार्फत फटाके, मशाल इत्यादीचा वापर करुन वनहत्तींना मानवी वस्तीपासून दुर करण्याचे प्रयत्न करण्यात येतात.
- हत्तींना जंगलाच्या दिशेने मार्गस्थ करण्याकरीता १४ अनुभवी व्यक्तींच्या चमूला (हुल्ला पार्टी) पश्चिम बंगालमधून पाचारण करण्यात आले आहे.
- हत्तींच्या कळपाबरोबर राहुन वन्य हत्तीमुळे घरांचे व शेतपिकांचे नुकसान कमी करणे व वन्य हत्तींचा कळप गावात येण्यापासून अटकाव करण्याची कार्यवाही सदर हुल्ला पार्टी मार्फत करण्यात येते.
- वन्य हत्तींचा कळप जंगलात कोणत्या ठिकाणी आहे व कोणत्या दिशेने वाटचाल करत आहे याची स्थिती समजण्यासाठी थर्मल ड्रोनचा वापर प्रभवीरित्या करण्यात येतआहे. त्यामुळे स्थानिकांना आगाऊ सूचना देवून पिक नुकसान व घर नुकसान कमी होण्यास मदत मिळत आहे.
- वन्य हत्ती मानवी वस्तीकडे येऊ नये म्हणून वनक्षेत्रामध्ये चांगल्या गुणवत्तेचा बांबु लावणे तसेच कुरण विकासाची कामे करुन नैसर्गिक अधिवासाची वृध्दी करण्यात येते. तसेच कुरण विकासाची कामे करण्यात येतात. कृत्रिम पाणवठे तयार करुन वन्य हत्तीना मुबलक प्रमाणात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था देखील करण्यात येते.
- हत्तींमुळे शेतीचे व घरांचे / मालमत्ता / शेतीपुरक अवजारे यांचे नुकसान झाल्यास तात्काळ नुकसानीचे पंचनामे करुन प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधित नुकसान ग्रस्त व्यक्तीस नुकसान भरपाई अदा करण्यात येते.
- वन्यहत्तींपासून होणाऱ्या नुकसानीबाबत वनकर्मचारी व संयुक्त वनव्यवस्थापन समिती मार्फत ग्रामसभा घेऊन लोकांना हत्तीपासून शेतपिक नुकसान न होणे व स्वत: जिवीताचे संरक्षण करणेबाबत जनजागृती करण्यात येत आहे. वनक्षेत्रपाल यांच्या सर्व वाहनांवर ॲम्पीफायर लावण्यात आले असून त्याव्दारे दररोज गावामध्ये सकाळ-संध्याकाळ दवंडी देण्यात येत आहे तसेच हत्ती बाधीत क्षेत्रात सावधानता माहिती फलक लावण्यात येत आहेत.
- हत्ती व इतर वन्यप्राण्यांच्या सवयी, त्यांचे खाद्य, पाणी, भ्रमण मार्ग इत्यादीचा शास्त्रोक्त पध्दतीने अभ्यास करण्याकरीता वन कर्मचाऱ्यांना आवश्यकतेनुसार प्रशिक्षण देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

### मुंबई-बडोदा महामार्गाच्या कामाकरीता केलेल्या भूसंपादनाच्या व्यवहारात झालेली अनियमितता

**(२३) * ५१७८४ श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-बडोदा महामार्गाकरिता ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी भूसंपादीत केल्या आहेत त्यांना उप विभागीय अधिकारी, भिवंडी, जि.ठाणे यांच्यामार्फत अनुदान वाटप करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महामार्गाच्या भूसंपादनामुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या जागी बनावट शेतकरी उभे करुन सुमारे १२ कोटी रुपये बळकाविल्याचे निदर्शनास आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, भिवंडी उपविभागीय कार्यालयाच्या माध्यमातून एका वयोवृध्द मृत आदीवासी महिलेच्या नावे बनावट कागदपत्रे तयार करुन तिला जिवंत दाखवून ५८ लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त भूसंपादीत केलेल्या जमिनीच्या अनेक व्यवहारामध्ये अनियमितता आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय.

(२) सदरची बाब निदर्शनास आल्यानंतर सदर प्रकरणी शांतीनगर पोलिस स्टेशनमध्ये (FIR No) प्रथम खबर अहवाल क्रमांक ०२३२ दिनांक २५.०४.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर प्रकरणी भिवंडी उप विभागीय कार्यालयाच्या माध्यामातून अन्य व्यक्तींना दिनांक ०६.०८.२०२१ रोजी अदा करण्यात आलेली सुमारे ५८ लाख रूपयांची मोबदल्याची रक्कम दिनांक ०९.११.२०२२ रोजी मोबदला स्विकारणाऱ्या अन्य व्यक्तीनी पुनश्च: भिवंडी उपविभागीय कार्यालयाच्या मूळ खात्यामध्ये जमा केलेली आहे.

(४) व (५) सदरची बाब निदर्शनास आल्यानंतर सदर प्रकरणी शांतीनगर पोलिस स्टेशनमध्ये (FIR No) प्रथम खबर अहवाल क्रमांक ०६९७/२०२२ दिनांक १६.११.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे, प्रकरण पोलिस तपासाधीन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### सावली (जि.चंद्रपूर) येथे पतसंस्थेने नागरिकांची केलेली फसवणूक

**(२४) * ५०८५५ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील मागासवर्गीय नागरी सहकारी पतसंस्था मर्या चंद्रपूर र.न.सी.एच.डी./आर.एस.आर./सी.आर.१५४ या पतसंस्थेने सावली येथे पतसंस्था स्थापन करुन जेष्ठ नागरिक, महिला, मध्यम व गोरगरीब नागरिकांकडून फिक्स डिपॉझिट, रिकरींग डिपॉझीट, डेली कलेक्शन, सेव्हिंग अकॉउंट च्या नावाने करोडो रूपये जमा करून आता ते पैसे परत देण्यास टाळाटाळ करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच खातेदार पैसे मागण्यासाठी गेले असता त्यांना धमक्या देण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर फसवणूक झालेल्या नागरिकांना त्यांचे सर्व पैसे पतसंस्थेकडून मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) होय.

चंद्रपूर जिल्ह्यातील मागासवर्गीय नागरी सहकारी पतसंस्था मर्या., चंद्रपूर या पतसंस्थेमध्ये १७१५ सभासद ठेवीदारांच्या रु. २.११ कोटी इतक्या ठेवी असून रुपये १.२८ कोटी रक्कमेचे कर्ज वाटप केले आहे. सध्यस्थितीत संस्थेस रुपये २३,२३,७१५ इतक्या रक्कमेचा तोटा झाला असल्यामुळे ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यास संस्था टाळाटाळ करीत आहे.

(२) नाही.

मागासवर्गीय नागरी सहकारी पतसंस्था मर्या., चंद्रपूर या संस्थेमध्ये खातेदार पैसे मागण्यासाठी गेले असता त्यांना धमक्या देण्यात आल्याचे सहकार विभागास निदर्शनास आले नाही.

(३) पतसंस्थेच्या सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात करण्यात आलेल्या लेखापरिक्षण अहवालाच्या अनुषंगाने पतसंस्थेत आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे तसेच सदर गैरव्यवहारास संस्थेचे संचालक मंडळ व अधिकारी/कर्मचारी जबाबदार असल्याचे निदर्शनास आले आहे.

जिल्हा उपनिबंधक, स.सं., चंद्रपूर यांनी कर्ज वसूली व ठेवीदारांच्या रकमा वाटप करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्याच्या सुचना संबंधीतांना देण्यात आल्या असून त्यानुसार सहकार न्यायालयात कलम ९१ अन्वये वसूली दावे दाखल केले आहेत. तसेच संस्थेच्या लेखापरिक्षकास तातडीने विशेष अहवाल व विनिर्दिष्ट अहवाल सादर करणेबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यात पीक कर्ज वाटपास दिरंगाई होत असल्याबाबत

**(२५) * ५२५४१ श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात रब्बीचा हंगाम सुरु होवूनही बँकाकडून शेतकऱ्यांना केवळ ९ टक्के रब्बी पीक कर्ज वाटप करण्यात आलेले असून हे पीक कर्ज वाटप अतिशय धिम्या गतीने सुरु असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच रब्बी पीक कर्ज वाटपासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक १९० कोटी, विदर्भ कोकण ग्रामीण बँक ४७ कोटी, राष्ट्रीयकृत बँक १ हजार ४५३ कोटी असे एकुण १ हजार ६६३ कोटी रुपयांची उद्दिष्ट्ये असून यापैकी आत्तापर्यंत १३७ कोटी म्हणजेच ९ टक्के पीक कर्जाचे वाटप करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) त्याचप्रमाणे अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असून नव्याने एकाही शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप करण्यात आले नाही, त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राज्यातील शेतकऱ्यांना तातडीने कर्ज वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) व (२) नाही.

सन २०२२-२३ रब्बी हंगामासाठी रु. १६६३.०४ कोटी पीक कर्ज वाटपाचा लक्षांक असून आतापर्यंत रु. ३८७.४९ कोटी इतक्या रक्कमेचे एकूण कर्जवाटपाच्या २३.३० % उद्दीष्टाचे पीक कर्ज वाटप करण्यात आले आहे. तसेच सध्या रब्बी हंगामासाठी पीक कर्जाचे वाटप सुरु आहे.

(३) बँकेच्या कर्ज विषयक धोरणानुसार पात्र खातेदारांना कर्जवाटप सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरात हडपसर येथे बनावट ना-हरकत प्रमाणपत्र देऊन मालमत्तांची बोगस दस्त नोंदणी केल्याबाबत

**(२६) * ४९९८७ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील दोन वर्षात तुकडाबंदी कायदा आणि स्थावर संपदा तथा मालमत्ता (विकास आणि नियमन) कायदा (रेरा) या दोन्ही कायद्याचे उल्लंघन करुन तसेच सक्षम प्राधिकरणाचे खोटे ना-हरकत प्रमाणपत्राच्या आधारे १० हजार ६३५ मालमत्तांची बोगस दस्तनोंदणी करुन संबंधित अधिकाऱ्यांनी कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बोगस दस्तनोंदणीची तपासणी करण्यासाठी शासनाने नोंदणी उपमहानिरीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या पथकाने राज्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालयातील नोंदणीची तपासणी करुन आपला अहवाल माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तपासणी पथकाने सादर केलेल्या अहवालास शासनाने मंजूरी दिल्यानंतर प्रथम दर्शनी निदर्शनास आलेल्या ठाणे व पुणे जिल्हयातील दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये बोगस दस्तनोंदणी प्रकरणी गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले व त्यानुसार शासनाने सदर गैरव्यवहारातील दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच प्रत्येक जिल्हयात तपासणी पथके नेमून त्यांनी केलेल्या तपासणीमध्ये कोणकोणत्या दुय्यम निबंधक दस्तनोंदणी कार्यालयामध्ये अशाप्रकारे गैरव्यवहार करण्यात आल्याचे निदर्शनास आले व यासंदर्भात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) पुणे, विभागामध्ये तुकडाबंदी कायदा आणि स्थावर संपदा तथा मालमत्ता (विकास आणि नियमन) कायदा (रेरा) या दोन्ही कायदयांचे उल्लंघन करुन दस्त नोंदणी झाल्याचे तपासणी अंतर्गत लक्षात आल्यानंतर सह दुय्यम निबंधक, हवेली क्र. १ ते २७ कार्यालयात नोंदविण्यात आलेल्या दस्तांची तपासणी करणेकरिता तपासणी पथकाचे गठन शासनामार्फत करण्यात आले होते.

सदर गठीत करण्यात आलेल्या तपासणी पथकाने केलेल्या तपासणीमध्ये तुकडाबंदी कायदा आणि स्थावर संपदा तथा मालमत्ता (विकास आणि नियमन) कायदा (रेरा) या दोन्ही कायदयातील तरतुदींचे पालन न करता एकूण १०५६१ दस्तऐवजांची नोंदणी झाल्याचे उघडकीस आले होते.

सदर दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर निलंबन,बदली, विभागीय चौकशी, समज इ.कारवाई सुरु करण्यात आली आहे.

(४) पुणे, ठाणे व नाशिक (सिन्नर-१, बागलाण, निफाड, औरंगाबाद व जालना), लातूर (उस्मानाबाद व परभणी) जिल्हयात असे गैरव्यवहार निदर्शनास आले असून दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेचा पंचवार्षिक बृहत आराखडा तयार करण्याबाबत**

**(२७) * ५१४८६ श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेचा पंचवार्षिक बृहत आराखडा सन २०१९-२०२० या कालावधीत तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आराखडा सन २०११ च्या लोकसंख्येच्या आधारे तयार करण्यात आला असून दहा वर्षाहुन अधिक कालावधी उलटला असल्याने या काळात झालेली लोकसंख्येची वाढ विचारात घेता बृहत आराखड्यामुळे नांदेड जिल्ह्यातील बरेचसे तांडे व वस्त्या विकासापासून वंचित रहात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त पार्श्वभूमिवर वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेचा पंचवार्षिक बृहत आराखडा नव्याने तयार करण्याची विनंती लोकप्रतिनिधींनी शासनाकडे माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) व (२) होय, वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेचा सन २०१९-२० ते २०२३-२४ च्या पंचवार्षिक बृहत आराखड्यानुसार नांदेड जिल्ह्यातील बंजारा तांड्यांची संख्या ८१५ असून लोकसंख्या २,७५,९३१ इतकी तसेच वस्त्यांची संख्या ९५८ असून लोकसंख्या २,३३,२२८ इतकी आहे.

सदर योजनेंतर्गत प्रामुख्याने विद्युतीकरण, पिण्याचे पाणी, अंतर्गत रस्ते, गटारे, शौचालये तसेच समाज मंदिर / वाचनालये व शक्य असेल तेथे मुख्य रस्त्याला जोडणाऱ्या रस्त्यांची कामे हाती घेण्यात येतात. मागील ४ वर्षांच्या कालावधीमध्ये जिल्हा नियोजन समिती व शासन स्तरावरुन ४१७ तांडा / वस्त्यांना मुलभूती सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने रुपये ४०,९६,२५,०००/- इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील गायरान जमिनीवरील अतिक्रमणे हटविण्याबाबत**

**(२८) * ५००६१ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर गायरान जमिनी असून ग्रामीण भागात सदर जमिनीवर अतिक्रमण होत असून तलाठी, ग्रामसेवक, तहसिलदार यांनी त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान

निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सरकारची १० हजार ८९ हेक्टर जमीन अतिक्रमणाखाली अडकली असून त्यावर २ लाख २२ हजार १५३ बेकायदा बांधकामे असल्याचेही माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, नाशिक जिल्ह्यातील शासकीय गायरान जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक ६ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास आदेशात नमूद केल्यानुसार गायरान जमिनीवरील अतिक्रमणे या वर्षाअखेर निष्कासित करावयाची असल्याने यासंदर्भातील कालबध्द आराखडा तयार करण्यात आला असून उपविभागीय अधिकारी यांना कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिनांक ३ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने यापूर्वी अशाप्रकारचे अतिक्रमण नियमित केल्याच्या धर्तीवर यासंदर्भात निर्णय घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री व मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १६.११.२०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राज्यातील कोकण, पुणे, नाशिक,औरंगाबाद, अमरावती व नागपूर या सर्वच विभागात गायरान जमिनीवर झालेल्या अतिक्रमणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) राज्यातील गायरान जमिनीवर अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.एमयुएन-२०१८/प्र.क्र.१९७/नवि-१८, दिनांक १७/११/२०१८ तसेच शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र.प्रआयो-२०१७/प्र.क्र.३४८/योजना-१०, दिनांक १६/०२/२०१८ तसेच शासन निर्णय, क्र.प्रआयो-२०२१/प्र.क्र.८१/ योजना-१०, दिनांक २२/०८/२०२२ मधील तरतुदीनुसार पात्र असलेली तसेच शासनाच्या यापूर्वीच्या इतर कोणत्याही धोरणानुसार / तरतुदीनुसार संरक्षित होणारी अतिक्रमणे वगळून उर्वरित अतिक्रमणे निष्कासित करावी,अशी शासनाची भूमिका आहे. सद्यस्थितीत प्रकरण न्याय-प्रविष्ठ असून मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०६ डिसेंबर, २०२२ च्या आदेशान्वये निष्कासनाच्या कार्यवाहीस पुढील आदेशापर्यंत स्थगिती दिली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यात खरीप हंगामात बनावट किटकनाशकांची बाजरात विक्री केल्याबाबत

**(२९) * ५०१८४ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात खरीप हंगामात मागील काही दिवसांपासून शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेत कंपन्यांनी बोगस किटकनाशक बाजारात विक्री केल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मानवत शहरातील शेतकऱ्यांनी पकडलेले किटकनाशक बनावट असल्याचा अहवाल औरंगाबादच्या शासकीय प्रयोगशाळेने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी विभागातील अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे अनेक कंपन्यांच्या किटकनाशकांना कायद्यानुसार विक्रीची परवानगी नसतानाही केवळ वनस्पती वाढ नियामकाच्या (पीजीआर) आधारे नावे बदलून बनावट किटकनाशकांची खुल्या बाजारात विक्री सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन बोगस किटकनाशकांची विक्री करणाऱ्यांसह दुर्लक्ष करणाऱ्या

संबंधित कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) अंशत: खरे आहे.

माहे ऑगस्ट २०२२ मध्ये बनावट किटकनाशक प्रकरणी मानवत पोलीस स्टेशन येथे गुन्ह्यांची नोंद झालेली आहे.
(२) हे खरे आहे.

अप्रमाणित अहवाल प्राप्त झाला आहे.
(३) व (४) हे खरे नाही. मात्र, मानवत पोलीस स्टेशन येथे Bio-R-३०३ चे १२० लिटर व धानुका अ‍ॅग्रोटेक कंपनीचा इमामेक्टीन बेंझोईट २५० ग्रॅम वजनाच्या १६ बॉटल एकूण रुपये ४,६५,३७६/- रक्कमेचा माल जप्त केला असल्यामुळे, सदर साठयाची शेतकऱ्यांना विक्री होणार नाही. तसेच, मानवत पोलीस स्टेशन मार्फत अधिक तपास चालू असून १२ आरोपींना अटक करण्यात आली आहे व त्यांचेकडून रु. १७.३९ लाख रुपयांच्या बनावट औषधांच्या ४७ पेटया जप्त करण्यात आल्या आहेत. त्यामुळे कृषि विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचेवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) येथे शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करुनही प्रकल्प उभारण्यात न आल्याबाबत

**(३०) * ५०१७४ कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) येथे मेढेखार, काळवड खाडीत प्रकल्प उभारण्याचे आमिष दाखवून ३७६ शेतकऱ्यांच्या जमिनी शासनाने संपादित केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित कंपन्यांनी, सदर प्रकल्प उभारुन स्थानिकांना रोजगार द्यावा, अन्यथा संपादित केलेल्या जमिनी परत करा, अशी मागणी समाज क्रांती संघटना संचलित अन्यायग्रस्त शेतकरी संघर्ष समितीने जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली असल्याचे दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अद्यापपर्यंत प्रकल्प उभारले नसल्याने सदरील सर्व जमिनी ओसाड झाल्या असून तेथे कांदळवन वाढल्यामुळे शेतकरी बाधित होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शेतकऱ्यांच्या मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) अलिबाग तालुक्यातील मेढेखार, काळवड येथील ४६-५२-२० हे.आर ही जमीन औद्योगिक प्रयोजनासाठी महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ मधील तरतुदीं अन्वये खाजगी कंपनीने खरेदीखताद्वारे खरेदी केल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) मे.पटनी एनर्जी प्रा.लि.या कंपनीने महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ६३ (१) (अ) नुसार सदर जमिनी विकत घेतल्या असून त्या जमिनींचा अद्यापपर्यंत वापर सुरू केलेला नसल्याचे निष्पन्न झाले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात “लम्पी” चर्मरोगाचा प्रादुर्भाव होवून हजारो पशुधन मृत्यूमुखी पडल्याबाबत**

**(३१) * ४९४५८ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.राजेंद्र शिंगणे (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३२ जिल्ह्यांमधील सुमारे २ हजार ४०४ गावांमध्ये मागील काही महिन्यापासून हजारो जनावरांमध्ये “लम्पी” या रोगाचा प्रादुर्भाव झाला असून सुमारे ३ हजार ६२२ पशुधनांचा मृत्यु झाला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील पशुसंवर्धंन विभागात जवळपास १८०० हून अधिक पदे रिक्त असल्याने लम्पी आजाराची आकडेवारी जमा करणे तसेच पुरेशा मनुष्यबळाचा अभाव असल्याने वेगाने लसीकरण होत नसल्याने तसेच पशुवैद्यकीय दवाखान्यात तज्ञ मनुष्यबळ, औषधे व इतर सुविधा नसल्याने पशुंवर योग्यप्रकारे उपचार होत नसल्यामुळे उक्त आजार अधिक वेगाने फैलावत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आजाराचा प्रादुर्भाव नियंत्रणात आणण्यासाठी शासनाने पशुसंवर्धन आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली कृषि गटाची स्थापना दिनांक १५ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास स्थापना केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पशुंमधील सदर लम्पी रोगाचा वाढता संसर्ग रोखण्याकरिता शेतकऱ्यांमध्ये जागृती आणि जनावरांच्या लसीकरणाचा व्यापक कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्य नियंत्रण क्षेत्र घोषीत करुनही उक्त रोगाची साथ नियंत्रणात येत नसून टास्क फोर्सच्या बैठकीत या आजाराची लस परिपूर्ण नसल्याबाबत चिंता व्यक्त करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, पशुपालकांना शासकीय मदत मंजूर होण्यासाठी अनेक प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागत असल्यामुळे पात्र पशुपालकांना नुकसान भरपाई मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, त्यानुषंगाने नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्यासह "लम्पी या रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत शासनाने कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली तसेच पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) राज्यात दिनांक ०४.०८.२०२२ रोजी लम्पी चर्मरोगाचा प्रादुर्भाव प्रथमत: चिनावल, ता. रावेर, जि. जळगाव येथे आढळून आला. तद्नंतर माहे ऑक्टोबर, २०२२ अखेर राज्यातील ३३ जिल्ह्यात २९१ तालुक्यांत लम्पी चर्मरोगाने ११,५४७ पशुधनाचा मुत्यु झालेला आहे.
(२) पशुसंवर्धन विभागातील मंजुर, भरलेली व रिक्त पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| **गट-अ** | २६४४ | २१४७ | ४९७ |
| **गट-ब** | ४१९ | ५३ | ३६६ |
| **गट-क** | १८९५ | ७६८ | ११२७ |
| **गट-ड** | १९०५ | ७०२ | १२०३ |
| **एकूण** | **६८६३** | **३६७०** | **३१९३** |

शासन निर्णय दिनांक १६.०९.२०२२ नुसार लम्पी चर्मरोगाच्या पार्श्वभुमीवर १४२१ पशुधन पर्यवेक्षक (जिल्हास्तर व राज्यस्तर), २९३ पशुधन विकास अधिकारी गट-अ अशा एकुण १७१४ मनुष्यबळाच्या सेवा नियमित सेवा उपलब्ध होईपर्यंत बाहयस्त्रोताव्दारे उपलब्ध करण्यासाठी मान्यता दिलेली आहे. त्यापैकी १२०५ पशुधन पर्यवेक्षक (जिल्हास्तर व राज्यस्तर), ४७ पशुधन विकास अधिकारी, गट अ, अशा एकूण १२५२ मनुष्यबळाच्या सेवा बाह्यस्त्रोताद्वारे उपलब्ध करुन घेण्यात आलेल्या आहेत.

पशुसंवर्धन विभागातील ५६ सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व २९८ पशुधन विकास अधिकारी गट-अ यांची रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याची, तसेच राज्यस्तरीय पशुधन पर्यवेक्षकांची रिक्त पदे नियमित स्वरूपात भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

तसेच, मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजनेतंर्गत ६५ सेवानिवृत्त पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत विविध पशुवैद्यकीय महाविद्यालयातील एकूण १८ टीमच्या माध्यमातून तज्ञ पशुवैद्यक तसेच विद्यापीठांतर्गत २३२ आंतर्वासिता विद्यार्थी अशा अतिरिक्त मनुष्यबळाच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

दिनांक १२ डिसेंबर, २०२२ अखेर राज्यातील एकुण १,३९,९२,३०४ गोवर्गीय पशुधनापैकी १,३९,८९,२१२ पशुधनास लम्पी प्रतिबंधात्मक गोटपॉक्स लसीचे लसीकरण करण्यात आले आहे.
(३), (४) व (५) गोवंशीय पशुधनामध्ये उद्भवलेला विषाणूजन्य लम्पी चर्मरोग नियंत्रणात आणण्यासाठी राज्यस्तरीय कार्य दलाचे (State Level Task Force) चे गठण करण्यात आलेले आहे.

गोवंशीय पशुधनामधील विषाणूजन्य व संसर्गजन्य लम्पी चर्मरोग प्रादूर्भाव नियंत्रणात आणण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्याची, प्रतिबंधात्मक लसीकरण व उपचाराची व्यापक मोहिम टास्क फोर्सच्या मार्गदर्शनाखाली हाती घेण्यात आली आहे.
(६) व (७) शासन निर्णय दिनांक १६.०९.२०२२ अन्वये शेतकरी/पशुपालक यांच्या मृत पशुधनास केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आपत्ती धोरणामधील आर्थिक निकषानुसार अर्थसहाय्य अदा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. यामध्ये प्रती मृत गाय रुपये ३०,०००/-, प्रती मृत बैल रुपये २५,०००/- व प्रती मृत वासरु रुपये १६,०००/- या प्रमाणे अर्थसहाय्य अनुज्ञेय करण्यात आलेले आहे. दिनांक १२.१२.२०२२ अखेर एकूण रुपये ३३८३.८५ लक्ष निधी

मृत पशुधनांच्या पशुपालकांस अर्थसहाय्यापोटी वाटप करण्यात आला आहे. उर्वरित अर्थसहाय्य वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे.

शासन निर्णय दिनांक १६.०९.२०२२, दिनांक १०.१०.२०२२ व दिनांक ९.१२.२०२२ अन्वये लम्पी चर्मरोग नियंत्रणात आणण्यासाठी जिल्हा नियोजन समिती कडील निधीतून प्रत्येक जिल्ह्यास एकूण रुपये ३.०० कोटी निधी औषधे व साधनसामग्री खरेदी, लसीकरणासाठी सेवा दात्यांना देण्यात येणारे मानधन, मृत पशुधनाची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे, आवश्यक तेथे औषध फवारणी करणे व इतर अनुषंगिक बाबींवर खर्च करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. या निधीमधून टास्कफोर्स व महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखालील उपचार प्रोटोकॉल नुसार जिल्हास्तरावर औषधांची उपलब्धता करण्यात आलेली आहे.

राज्यातील गोवंशीय पशुधनामध्ये उद्भवलेल्या विषाणूजन्य लम्पी चर्मरोग नियंत्रणात आणण्यासाठी राज्यस्तरीय कार्यदलाचे गठण करणे, राज्यातील गोवर्गीय पशुधनामध्ये १०० टक्के मोफत लसीकरण व उपचार, लंपी चर्म रोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय समितीची स्थापना करणे, शेतकरी, पशुपालक यांच्या मृत पशुधनास केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आपत्ती धोरणामधील आर्थिक निकषानुसार अर्थसहाय्य देणे, इत्यादी च्या माध्यमातुन सदर रोगाचा वाढता प्रादुर्भाव नियंत्रित करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील तुकडेबंदी व ग्रामपंचायत हद्दीतील सदनिकांची तसेच पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या गावांतील गृहप्रकल्पांची दस्त नोंदणी बंद केल्याबाबत

**(३२) * ५१७५१ श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तुकडेबंदी व ग्रामपंचायत हद्दीतील सदनिकांची तसेच पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या गावांतील गृहप्रकल्पांची दस्तनोंदणी बंद केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गृहप्रकल्प बांधकाम व्यावसायीकांनी ग्रामपंचायतीच्या परवानगीने बांधलेले असल्याने पालिका तसेच पीएमआरडीए यांनी त्यांचे नियम लावल्याने सदरहू प्रकल्पांवर कारवाई करीत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदरहू सदनिकांची दस्त नोंदणी बंद केल्याने गृहप्रकल्पांची दुरवस्था झाली असल्याने बांधकाम व्यवसायीकांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गुंठेवारीच्या बांधकामातील सदनिकांची दस्त नोंदणी सुरु करण्याबाबत वांरवार मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त दस्त नोंदणी सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र शेतजमिनीचे तुकडे पाडण्यास व त्याचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियमानुसार, महाराष्ट्र नोंदणी नियम १९६१ चे नियम ४४(१)(ई) नुसार प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राची दस्त नोंदणी करताना सक्षम अधिकाऱ्याची परवानगी दस्तासोबत जोडली असल्यास दस्त नोंदणी करण्यात येते.त्याचप्रमाणे ग्रामपंचायत हद्दीतील सदनिकांची तसेच पुणे महानगरपालिकेत समाविष्ठ करण्यात आलेल्या गावाच्या गृहप्रकल्पांची दस्त नोंदणी करताना दस्तासोबत योग्य प्राधिकरणाकडील पूर्णत्वाचा दाखला किंवा रेरा प्रमाणपत्र जोडल्यास दस्त नोंदणीसाठी कोणतेही बंधन नाही. तसेच गुंठेवारीच्या बांधकामातील सदनिकांची दस्त नोंदणी करताना योग्य नियमितीकरण दाखला जोडल्यास दस्त नोंदणी

करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अनधिकृत बांधकाम निर्मुलन वभिागामार्फत गावठाण हद्दीच्या बाहेरील अनधिकृत बांधकामे व ले-आऊट मंजूर करुन न घेता केलेले विकसन याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदींच्या अनुषंगाने कारवाई करण्यात येते.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे आहे.

(५) महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे एकत्रिकीकरण करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०१५ मध्ये दिनांक ०१/०१/२०१६ रोजी नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या कलम ८ ब मधील तरतुदी नोंदणी अधिकाऱ्यांना अवगत करणेस्तव नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाने दिनांक १२/०७/२०२१ रोजीचे सर्वसमावेशक असे परिपत्रक निर्गमित केले आहे. सदर परिपत्रकाविरुध्द गोविंद रामलिंग सोलापूरे यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन नं. २१११/२०२२ दाखल केले होते. प्रस्तुत रिट पिटीशनच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठाने दिनांक ०५/०५/२०२२ रोजी याचिकाकर्त्यांचे बाजूने निर्णय पारित केला आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई,औरंगाबाद खंडपीठाचे सदर निर्णयाचे अनुषंगाने नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाने मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठासमोर दिनांक ६/६/२०२२ रोजी रिव्हयूअर्ज (review application) दाखल केला असून मा.न्यायालयाने सद्य:स्थितीत दिनांक ५/५/२०२२ रोजीच्या निर्णयास स्थगिती दिलेली आहे. भविष्यात मा.न्यायालयाच्या आदेश/निर्णयानुसार प्रस्तुत कायदा/नियमात सुधारणा होवून तसे आदेश प्राप्त झाल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**राज्यातील शेतकऱ्यांना सिबिल तपासून कर्ज देण्याची भूमिका बँकांनी घेतल्याबाबत**

**(३३) *५३०९२ श्री.राम सातपुते (माळशिरस), श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना कर्ज देताना त्यांचा सिबिल तपासून कर्ज देण्याची भूमिका बँकांनी घेतल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिझर्व्ह बँकेच्या निकषानुसार आता पीक कर्ज वा मध्यम तसेच दीर्घ मुदतीच्या कर्जासाठी सिबिलचा अर्थातच क्रेडिट इन्फर्मेशन ब्युरो इंडिया लिमिटेडचा निकष लागू करण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांचा सिबिल स्कोअर किमान ६०० ते ७०० पर्यंत असून अशा शेतकऱ्यांनाच बँका पीक कर्जाचे वाटप करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नैसर्गिक आपत्तीमुळे कित्येकदा शेतकरी कर्ज परतफेड करु शकत नाही, असे असताना सिबिल तपासून कर्ज दिल्यास अनेक शेतकरी कर्जासाठी पात्र ठरु शकणार नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने कर्ज देत असताना सिबिल अट रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

शेतकऱ्यांना बँकांमार्फत द्यावयाच्या कर्जाच्या अनुषंगाने भारतीय रिझर्व्ह बँकेने व नाबार्डने मार्गदर्शक सुचना दिल्या आहेत. त्यानुसार व्यापारी बँकांच्या कर्ज धोरणामध्ये सिबिल व सिबिल स्कोअर तपासण्याची बाब अंतर्भूत आहे. तथापी इतर आवश्यक बाबींचा विचार करुन कर्ज मंजूरीबाबत निर्णय घेतला जातो.

तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक कर्ज मंजूरीसाठी सिबिल स्कोर तपासत नाही.
(३) नैसर्गिक आपत्ती प्रसंगी शेती कर्जाचे मध्यम मुदत कर्जात पुनर्गठन करण्यात येते व कर्जदारास नव्याने पीक कर्ज पुरवठा सुध्दा करण्यात येतो. सदर कर्ज पुरवठा करतांना सिबिल स्कोर विचारात घेतला जात नाही.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कारभाराची चौकशी होण्याबाबत**

**(३४) * ५२७९४ श्री.महेंद्र दळवी (अलिबाग) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यात मध्यवर्ती सहकारी बँकेकडून शेतकऱ्यांना कर्ज वाटप करताना त्रिस्तरीय पद्धतीचा अवलंब न करणे, बोगस शेतकरी दाखवून कर्ज वाटप करण्यात येणे, जमिनींच्या मूल्यांकनात फेरफार करुन कर्ज वाटप करणे व कार्यकक्षेबाहेर कर्ज वाटप करणे अशी नियमबाह्य कामे सुरु असल्याने बँकेतील ठेवीदारांचे नुकसान होण्याची बाब नुकतीच निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुषंगाने महात्मा ज्योतीराव फुले कर्ज मुक्ती योजना २०१९ अंतर्गत विनोद शांताराम म्हात्रे, रा.वढाव, (ता.पेण, जि.रायगड) यांनी कर्ज घेतले नसतानाही रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने त्यांच्या बचत खाती कर्जाची रक्कम जमा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या महात्मा ज्योतिबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत झालेल्या कर्जवाटपाबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जि.रायगड यांनी बँकेला तात्काळ कारवाई करण्याचे सूचीत केले असल्याचे सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी सांगितले असूनही बँकेने कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात बेकायदेशीरपणे झालेल्या कर्ज वाटपाबाबत रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत दोषींवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार आहे काय,
(५) याप्रकरणाची चौकशी केली असल्यास चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार संबंधित दोषींवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) व (२) या प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, रायगड यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नियुक्त करण्यात आलेली आहे.
(३) नाही.
(४) व (५) या प्रकरणी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांनी चौकशी करुन श्री.बारटक्के, बँक निरीक्षक पेण यांची वार्षिक वेतनवाढ रोखली असून त्यांची बदली करण्यात आली आहे.
तसेच या संदर्भातील तत्कालीन संस्था सचिव श्री.किरण पाटील, तत्कालीन शाखाधिकारी श्रीमती विद्या पाटील तसेच विद्यमान शाखाधिकारी श्रीमती समिधा पाटील यांची वार्षीक वेतनवाढ स्थगित करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(३५) * ४९८३३ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), कॅप्टन आर.**

**सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्राच्या किनारपट्टीवरील दिनांक १ ऑगस्ट पासून सुरू झालेला मासेमारी व्यवसाय अनिश्चित व लहरी वातावरणामुळे अडचणीत आल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनिश्चित हवामानामुळे जाळयात मासे सापडत नसून इंधन व उपकरणापोटी लागणारा खर्च देखील निघत नसल्याने मासेमारी व्यवसाय धोक्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याचा परिणाम माशांच्या निर्यातीवर होऊन कोट्यवधी रुपयांचे परकीय चलन मिळवून देणारा मासेमारी व्यवसाय धोक्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या पार्श्वभूमीवर मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्याच्या अनुषंगाने अभ्यासगट स्थापन करण्याची मागणी कोळी महासंघाने केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त मागणीनुसार अभ्यासगट स्थापन करून नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) माहे ऑगस्ट २०२२ ते सप्टेंबर, २०२२ या कालावधीतील खराब वातावरणामुळे मच्छिमारांना काही कालावधीसाठी मासेमारी करता आलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, यामुळे मासेमारी व्यवसाय धोक्यात आलेला आहे, असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही.

(४) व (५) हे खरे आहे.

राज्याच्या किनारी भागात येणाऱ्या चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या मासेमारांना देण्यात येणारी नुकसान भरपाई ही मदत व पुनर्वसन विभागामार्फत देण्यात येते.

कोकणातील किनारी भागात चक्रीवादळामुळे निर्माण झालेल्या मत्स्यदुष्काळाच्या संदर्भात प्रधान सचिव (पदुम) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०९ डिसेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीची कार्यकक्षा ही संपुर्णपणे तांत्रिक बाबींशी निगडीत असल्यामुळे प्रधान सचिव (पदुम) यांच्या अध्यक्षतेखालील समितीचे पुनर्गठण करुन प्रधान सचिव (पदुम) यांच्या अध्यक्षतेखालील पुनर्विलोकन समिती गठित करण्याबाबत व आयुक्त (मत्स्यव्यवसाय) यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती गठित करण्याबाबत दिनांक ०४ मे, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली असुन समितीमार्फत कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील नरभक्षक वाघांचा बंदोबस्त करण्याबाबत

**(३६) * ५३९१९ डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यामध्ये नरभक्षक वाघांनी धुमाकूळ घातला असून ४० हून अधिक नागरीकांचा बळी घेतला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाघांच्या हल्ल्यांमुळे नागरिकांमध्ये दहशत निर्माण झाली असून सर्वसामान्य नागरिक वाघांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रशासनाकडे सातत्याने मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात वाघांचा बंदोबस्त करण्यासाठी हजारो नागरिकांनी मुख्य वनसंरक्षक यांच्या कार्यालयासमोर आंदोलन, मोर्चे, धरणे आंदोलन केलेले असूनही वनविभाग वाघांना पकडण्यात अपयशी ठरले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व, त्यानुसार मृत नागरिकांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देऊन वाघांचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) गडचिरोली वनवृत्तामध्ये सन २०१९ ते दिनांक ०३.१२.२०२२ या कालावधीत वाघाच्या हल्ल्यात एकूण ४२ व्यक्तींचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) गडचिरोली वनवृत्तातील वडसा वन विभागामार्फत दिनांक १६.०५.२०२२ रोजी T-९ व दिनांक १३.१०.२०२२ रोजी CT-१ या मानवी जिवीतास धोकादायक ठरणाऱ्या दोन नर वाघांना जेरबंद करण्यात आले आहे. तसेच मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचेकडून दिनांक १०.१०.२०२२ रोजी T-६ या वाघाला पकडण्याची परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, पेंच व्याघ्र प्रकल्प व अमरावतीच्या जलद बचाव पथकाच्या मदतीने सदर वाघाला जेरबंद करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.
(४) गडचिरोली वनवृत्तामध्ये सन २०१९ ते दिनांक ०३.१२.२०२२ या कालावधीत वाघाच्या हल्ल्यात मृत झालेल्या ४२ व्यक्तींपैकी ३७ व्यक्तींच्या कायदेशीर वारसा प्रचलित नियमातील तरतुदीनुसार पूर्ण अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे. उर्वरित ०५ व्यक्तींच्या वारसास काही प्रमाणात आर्थिक मदत अदा करण्यात आली असून अवश्यक कागदपत्रांची पूतर्ता झाल्यावर शिल्लक असलेले अर्थसहाय्य अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या दृष्टीकने क्षेत्रीयस्तरावर खालील प्रामणे उपाययोजना करण्यात येतात :-

- वनक्षेत्रात तसेच वनक्षेत्राजवळच्या भागामध्ये वन कर्मचाऱ्यांमार्फत दिवस-रात्र गस्त घालण्यात येते.
- मानव-वन्यप्राणी संघर्षा दरम्यान घ्यावयाच्या खबरदारीबाबत स्थानिकांमध्ये जनजागृती करण्यात येते.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी तसेच भक्ष्य उपलब्ध व्हावे याकरीता उपाययोजना करण्यात येतात.
- क्षेत्रीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्यादृष्टीने प्रशिक्षण देण्यात येते.
- वन्य प्राण्यांच्या हालचालीवर नियंत्रण / लक्ष ठेवण्याकरीता ट्रॅप कॅमेरा, पिंजरे इत्यादी साहित्य उपलब्ध करुन देण्यात आले असून त्यामार्फत Tracking केले जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालेगांव (जि.नाशिक) येथील मध्यवर्ती बँकेने थकबाकीदारांवर कारवाई सुरु केल्याबाबत

**(३७) * ५०२२९ श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.नाशिक) येथील मध्यवर्ती बँकेने १५० थकबाकीदारांवर कारवाई सुरु केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील ६७२७ थकबाकीदारांकडे ८६ कोटी २१ लाख १२ हजार इतकी थकबाकी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील काही महिन्यांपासून दृष्काळसदृश परिस्थिती, ओला दुष्काळ, अतिवृष्टी व शेतमालालाही हमीभाव मिळत नसल्याने तसेच शासनाने कर्जमाफीची घोषणा करुनही त्यावर अंमलबजावणी होत नसल्यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन सदर निर्णयाच्या फेरविचाराबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) व (२) होय.
(३) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ अंतर्गत मालेगांव तालुक्यातील १६,४४९ पात्र शेतकऱ्यांना रुपये १०२.९९ कोटी कर्जमाफीचा लाभ देण्यात आला असून महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत

मालेगांव तालुक्यातील १५,१६१ पात्र शेतकऱ्यांना रुपये १६७.८३ कोटी कर्जमुक्तीचा लाभ देण्यात आला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पालघर जिल्ह्यातील दांडाखटाळी या पुलाच्या आधार खांबाजवळ बेकायदा रेती उत्खनन सुरु असल्याबाबत**

**(३८) * ५३३२५ श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील पालघर, केळवे, माहिम भागाला उसरणी, एडवण दातिवरे भागाला जोडणाऱ्या दांडाखटाळी या महत्त्वपूर्ण पुलाच्या आधार खांबाजवळ बेकायदा रेती उत्खनन सुरू असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दांडाखटाळी या महत्वपुर्ण पुलाच्या आधार खांबाजवळ बेकायदा रेती उत्खनन सुरु असल्याने पुलाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी होत असलेले बेकायदा उत्खननाकडे महसूल विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) पालघर जिल्ह्यातील पालघर, केळवे व माहीम भागाला उसरणी, एडवण व दातिवरे भागाला जोडणाऱ्या दांडा खटाळी या पुलाच्या आधार खांबाजवळ बेकायदा रेती उत्खनन सुरु असल्याने पुलाला धोका निर्माण झालेबाबत दिनांक ०८/०९/२०२२ रोजी लोकसत्ता वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने केलेल्या पाहणीमध्ये सदर पुलाच्या दोन्ही बाजूने कुठेही रेती उत्खनन करणाऱ्या बोटी किंवा सक्शन पंप आढळून आलेले नाहीत. दांडा खटाळी या पूलास किंवा पूलाच्या पायास धोका दिसून येत नाही असा अहवाल कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर यांनी सादर केला आहे.

पालघर जिल्ह्यातील गौण खनिजाच्या अवैध उत्खननास व वाहतूकीस आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत दक्षता पथक तसेच, महसूल, परिवहन व पोलिस यांच्या संयुक्त पथकामार्फत वेळोवेळी कारवाया करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात यावर्षीच्या हंगामात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे सोयाबीन आणि**
**कापूस पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याबाबत**

**(३९) * ५०१०० श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल),**

**श्री.बबनराव शिंदे (माढा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वत्र अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या सोयाबीन आणि कापूस पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून उत्पादन खर्चाच्या तुलनेत पिकांना कमी भाव मिळत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोयाबीनला किमान रुपये ८,६०० व कापसाला रुपये १२,५०० इतका हमी भाव देण्याची मागणी शेतकरी संघटनेने शासनाकडे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सोयाबीन उत्पादनासाठी लागणारा भांडवली खर्च, बियाणे, खते, शेतमजुरी, कीटकनाशकांची फवारणी, कापणी, काढणी हा खर्च वाढला असून बाजारपेठेतील भाव कमी झाल्यामुळे शेतीसाठी लागणारा खर्च देखील निघत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शेतकऱ्यांना योग्य तो हमीभाव देऊन आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) हे खरे नाही.
सोयाबीन आणि कापूस या पिकांकरीता खरीप विक्री हंगाम २०२२-२३ करीता केंद्र शासनाने जाहिर केलेल्या आधारभुत किंमत अनुक्रमे प्रति क्विंटल रुपये ४३००/- व रुपये ६३८०/- अशी आहे.

सन २०२२-२३ (५.१२.२०२२ पर्यंत)करीता सोयाबीन या पिकाची खुल्या बाजारभावाची किंमत ही प्रति क्विंटल रुपये ४६४०/- ते रुपये ५२२१/- अशी आहे. कापूस या पिकाची खुल्या बाजारभावाची किंमत ही प्रति क्विंटल रुपये ६८००/- ते रुपये ८७२५/- अशी आहे.
खुल्या बाजारभावाच्या किंमती या केंद्र शासनाने जाहिर केलेल्या आधारभुत किंमतीपेक्षा जास्त आहेत.
(२) उत्पादन खर्चाच्या तुलनेत सोयाबीन व कापूस या पिकांना कमी भाव मिळत असल्याने हमीभावाच्या किंमतीत वाढ करण्याबाबत निवेदन प्राप्त झाले आहे.
(३) महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार बियाणे, खते, शेतमजूरी, किटकनाशकांची फवारणी, कापणी, काढणी हा खर्च वाढल्यामुळे उत्पादन खर्चात वाढ झाल्याची दिसून येते.
(४) हमीभाव जाहीर करणे ही पूर्णपणे केंद्र शासनाच्या अखत्यारितील बाब असून किमान हमी भाव वाजवी मिळावेत म्हणून राज्य शासन नेहमीच केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घेत असते. राज्य कृषि मूल्य आयोगाकडून राज्यातील प्रमुख पिकांच्या उत्पादन खर्चावर आधारित किंमती केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाकडे प्रस्तावित करण्यात येतात.

केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोग, विविध पिकांच्या किमान आधारभूत किंमतीची शिफारस केंद्र शासनाकडे करते व त्या आधारे केंद्र शासन राष्ट्रीय पातळीवर आधारभूत मूल्य योजनेत समाविष्ट शेतमालाच्या आधारभूत किंमती निश्चित करुन जाहीर करीत असते. केंद्र शासनाने जाहीर केलेल्या शेतमालाच्या आधारभूत किंमती सर्व राज्यांना लागू होतात
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात ओबीसी विद्यार्थ्यांसाठी "ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना" सुरु करण्याबाबत

**(४०) * ४९५३५ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.लक्ष्मण जगताप**

**(चिंचवड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुसूचीत जातीतील (एससी) विद्यार्थ्यांसाठी २८६९ अनुसूचीत जमातीसाठी (एसटी) ९७३ शासकीय वसतीगृहे आहेत मात्र मागील ७५ वर्षात ओबीसी विद्यार्थांसाठी एकही वसतीगृह झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच स्वाधार आणि स्वयमच्या धर्तीवर ओबीसी विद्यार्थ्यांसाठी "ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना" सुरु करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास इतर मागास बहुजन कल्याण मंत्री यांचेकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीबाबत विविध सामाजिक संघटनांनी दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास वर्धा येथे आंदोलनही केले तसेच शासनाकडून इतर मागासवर्गीय कल्याण मंत्रालय स्वतंत्र स्थापन करुन स्वतंत्र वसतिगृहाची घोषणा करण्यात येवून याबाबत दिनांक ३० जानेवारी, २०१९ मध्ये परिपत्रक काढले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यानुषंगाने स्वाधार आणि स्वयमच्या धर्तीवर ओबीसी विद्यार्थ्यांसाठी "ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना" सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१), (२), (३) होय, खरे आहे, केंद्र शासनाच्या बाबू जगजीवनराम छात्र आवास योजनेतून मिळणाऱ्या अर्थसहाय्यातून राज्यातील इतर मागासवर्गातील मॅट्रीकोत्तर शिक्षण घेणाऱ्या मुलांसाठी १८ व मुलींसाठी १८ असे एकूण ३६ वसतिगृह सुरू करण्याबाबत शासन निर्णय, क्रमांक-इमाव-२०१६/प्र.क्र.५८/विजाभज-१ दिनांक ३०.०१.२०१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत वसतीगृहासाठी शासकीय जमीन उपलब्ध झालेल्या नागपूर, अहमदनगर, वाशिम व यवतमाळ या जिल्ह्यांचे प्रस्ताव केंद्र शासनास मान्यतेसाठी पाठविण्यात आले असून केंद्र शासनाने उपस्थित केलेल्या त्रुटींची पुर्तता करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील मॅट्रीकोत्तर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी १०० विद्यार्थी क्षमतेचे मुलांसाठी १ व मुलींसाठी १ या प्रमाणे ३६ जिल्हयाच्या ठिकाणी ७२ शासकीय वसतिगृहे भाडयाच्या इमारती घेऊन, मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा, १९५० व संस्था नोंदणी कायदा, १८६० अंतर्गत नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थांच्या (N.G.O) माध्यमातून सुरु करण्यास व त्यासाठी रुपये ७३.८१ कोटी इतक्या खर्चास दिनांक २९/११/२०२२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.
(४) व (५) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**आडचीवाडी (ता.पुरंदर, जि.पुणे) येथील अंजीर बागांवर तांबेरा व करपा रोगांचा प्रादुर्भाव झाल्याबाबत**

**(४१) * ५१७६५ श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आडचीवाडी (ता.पुरंदर, जि.पुणे) येथील अंजीर बागांवर परतीचा पाऊस, कडक्याची थंडी, ढगाळ वातावरणामुळे तांबेरा व करपा आदी रोगांचा प्रादुर्भाव होवून ५० ते ६० टक्के फळे गळल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अंजीर उत्पादक शेतक-यांचे हजारो रुपयांचे नुकसान होत असून बागांवर केलेला खर्चही निघत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नुकसान झालेल्या शेतक-यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) हे अंशत: खरे आहे.

माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये झालेल्या अतीवृष्टीमुळे तांबेरा व करपा आदी रोगांचा प्रार्दुभाव १० ते १५ टक्के आढळून आला आहे. परंतु फळगळ झालेली आढळली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) तांबेरा व करपा रोग नियंत्रणाकरीता कृषि विभागाने फवारणीच्या उपाययोजना सुचवून मार्गदर्शन केले. अंजीर व सिताफळ संशोधन केंद्र जाधववाडी येथील वरीष्ठ शास्त्रज्ञ यांनी दिनांक ०३.१०.२०२२ रोजी आडची वाडी फळबागांची पाहणी करुन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. अंजीर व सिताफळ संशोधन केंद्र जाधववाडी यांनी दिलेल्या शिफारशी कृषि वार्ता फलकावर लावण्यात आल्या व शेतकऱ्यांच्या व्हॉटसप ग्रुप वर ही प्रसारीत केल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात फळ पीकविमा योजनेत संत्री फळ पीक विमा संरक्षित रक्कम न वाढवता**
**विमा हप्त्याच्या रकमेत तीन पटीने वाढ झाल्याबाबत**

**(४२) * ५०२६९ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात फळपिकांच्या हवामान धोक्याच्या निकषानुसार पुनर्रचित हवामान आधारित फळ पीकविमा योजनेत संत्री फळ पीक विमा संरक्षित रक्कम न वाढवता विमा हप्त्याच्या रकमेत तीन पटीने वाढ करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी माहे नोव्हेंबर महिन्यात त्यांचा हिस्सा विमा कंपनीकडे भरल्यानंतर ताबडतोब माहे डिसेंबर ते पुढील हंगामापूर्वी मे महिन्यापर्यंत नैसर्गिक आपदा-गारपीट विमा संरक्षण कालावधी देण्याऐवजी दोन महिन्यांनी घटवून माहे जानेवारी ते माहे एप्रिल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार विमा हप्ता रक्कम कमी करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) होय, हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सुचनांनुसार पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजना मृग बहार सन २०२० पासून कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक करण्यात आली आहे. तसेच केंद्र शासन कोरडवाहू जिल्ह्यांना ३० टक्के व बागायती जिल्ह्यांना २५ टक्केच्या मर्यादेत त्यांचा समप्रमाणातील हिस्सा अदा करणार आहे. या योजनेतंर्गत अधिसुचित सर्व जिल्हे हे कोरडवाहू असल्याने राज्याला ३० टक्के मर्यादा लागू आहे. केंद्र शासनाने ज्याप्रमाणे विमा हप्ता रकमेतील महत्तम मर्यादा १२.५० टक्के निश्चित केली आहे. त्याचप्रमाणे राज्य शासनानेही विमा हप्ता रकमेतील महत्तम मर्यादा निर्धारित करुन ३० ते ३५ टक्के पर्यंतचे अतिरिक्त ५ टक्के विमा दायित्व स्विकारुन ३५% च्या वरील विमा हप्ता राज्य शासन व शेतकरी यांनी प्रत्येकी ५०:५० टक्के प्रमाणे भरावयाचा आहे. यापुर्वी सन २०२०-२१ पर्यंत विमा दरामध्ये शेतकऱ्यांना फळपिकनिहाय प्रति हेक्टरी विमा संरक्षित रक्कमेच्या ५ टक्के किंवा वास्तवदर्शी दर या पैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम विमा हप्ता म्हणून शेतकऱ्यांना भरावी लागत होती. सन २०२१-२२ मध्ये ३५ टक्के किंवा त्यापेक्षा कमी विमा हप्ता दर प्राप्त झालेल्या फळपिकांसाठी शेतकऱ्यांनी भरावयाच्या विमा हप्ता दर ५ टक्के आहे. मात्र काही फळपिकांसाठी काही जिल्ह्यांमध्ये ३५ टक्के पेक्षा अधिक विमा हप्ता दर प्राप्त झाल्यामुळे शेतकऱ्यांनी भरावयाच्या विमा हप्ता दरामध्ये वाढ झालेली आहे.

(२) हे खरे नाही.

आंबिया बहारातील संत्रा या फळपिकासाठी विमा संरक्षण कालावधी दिनांक १ डिसेंबर ते ३१ मे असा आहे. तसेच गारपीट या अतिरिक्त हवामान धोक्याचा कालावधी ०१ जानेवारी ते ३० एप्रिल असा आहे.

संत्रा या फळपिकाचे हवामान धोके व विमा संरक्षित कालावधी हा कृषि विद्यापिठ व राष्ट्रीय लिंबू वर्गीय फळ संशोधन संस्था, नागपूर येथील शास्त्रज्ञ यांनी शिफारस केल्याप्रमाणे शासन निर्णयामध्ये समाविष्ठ करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.